RNI No. MAHMAR48925

# स्वयम् ब्राह्मण सेवा

अंक २ । मुंबई । एप्रिल–जून २०२२



## सामूहिक व्रतबंधन समारंभ








## चैत्रगौरी हळदीकुंकू






## वर्धापन दिन - सत्यनारायण पूजा







नमस्कार,

ह्या वर्षातील आज दुसरे संपादकीय! कोरोनानंतर पहिल्यांदाच आता मंडळाचा वर्धापन दिन आणि त्यानिमित्त श्रीसत्यनारायण पूजेचे आयोजन होत आहे.

मागील महिन्यात चैत्रगौरीनिमित्त हळदीकुंकू झाले तसेच सामुदायिक व्रतबंध इत्यादी कार्यक्रम झाले. त्यास उत्तम प्रतिसाद मिळाला.

ह्या वर्षात आगामी सांस्कृतिक कार्यक्रम जसे की वटपौर्णिमा, हरितालिका, श्रीगणेशोत्सव करायचे ठरले आहे.

त्याची वेळ, तारीख  कळवण्यात येईल..

त्याचा सभासदांनी लाभ घ्यावा..

तसेच मंडळाची सर्वसाधारण सभा होणार आहे, त्यासाठीही उपस्थित राहून सहकार्य करावे.

नेरुळ येथील आनंदाश्रमाचे / प्रकल्पाचे काम सुरू झाले आहे. एक अतिशय चांगला सामाजिक उपक्रम आपण हाती घेतला आहे, तरी मी सर्व सभासदांना आवाहन करतो की, त्यांनी यथोचित आर्थिक सहकार्य करून; हा उपक्रम यशस्वी करावा.

**– कौस्तुभ महाजन**
प्रमुख कार्यवाह


■ कार्यकारी संपादक

**श्री. योगेश यशवंत केळकर**

■ स्वयम् संपादकीय मंडळ

**श्री. संतोष बाळकृष्ण वैद्य**
**श्री. अनिरुद्ध सदाशिव गोडसे**
**श्री. कौस्तुभ वसंत महाजन**
**श्री. सतीश कृष्णाजी विद्वांस**
**सौ. कल्पना वसंत साठे**
**सौ. अधिता अर्चिस लेले**

■ संपादन सहाय्य

**श्री. मनोज आचार्य**

■ मुखपृष्ठ

**श्री. मनोज आचार्य**

■ अक्षरजुळणी व मांडणी

**अद्वैत प्रिंट्स**



■ संपादकीय विभाग पत्रव्यवहार

**स्वयम, ब्राह्मण सेवा मंडळ**
भवानी शंकर रोड, दादर (प.)
मुंबई-४०००२८
दूरध्वनी : २४२२९११८
२४३७१९४९

कार्यालयीन वेळा (रविवार बंद)
सकाळी ८.३० ते १२.३०
सायंकाळी ४.३० ते ८.३०
ई-मेल : svayambsm@gmail.com
वेबसाईट : www.bsmdadar.com

# राजकीय स्वार्थ हाच सर्वपक्षीय उद्देश

**दिलीप चावरे**

नैतिकता, विचारधारा, तत्त्व आणि निष्ठा गुंडाळून ठेवून राज्यात महाविकास आघाडीची सत्ता किमान समान कार्यक्रमाच्या मिषाने अडीच वर्षांपूर्वी स्थापन झाली. त्यानंतर देशात अनेक घडामोडी झाल्या, मात्र महाराष्ट्रात त्यांचा प्रभाव जाणवला नाही. एका प्रकारे सत्ता हा मुद्दा किती प्रबळ असतो याचा पुरावाच 'तीन चाकी रिक्षा' अशी संभावना करण्यात आलेल्या आघाडीने दिला आहे. मुख्यमंत्र्यांच्या गैरहजेरीतही कारभार चालू शकतो, हा या अडीच वर्षांत लागलेला आणखी एक मौलिक शोध.



अर्थात ही केवळ महाराष्ट्राच्या राजकारणातील शोकांतिका नव्हे. एकंदरीतच राजकारण आणि नैतिकता नाहीशी होत असल्यामुळे कोण बरोबर आणि कोण कोणाचा शत्रू आहे हे समजत नाही. तरीही वारे कसे वाहतील, हे ओळखून तरबेज राजकारण्यांनी आज आपले मार्ग निवडलेले आहेत. त्यांना पावन करून घेणे हाच राजकीय कार्यक्रम झाला आहे. यातून उडदातले काही गोरे तर बहुतेक काळे सर्वत्र दिसत आहेत. महाराष्ट्राचा विचार बाजूला पडून, स्वार्थ हाच एक कलमी कार्यक्रम असल्यासारखे चित्र निर्माण झाले आहे.

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आले, कारण शिवसेनेने अनेक वर्षांची साथ सोडून भाजपच्या नेत्यांना कात्रजचा घाट दाखवला. हा बदल कोणालाच रुचलेला नाही. ही वस्तुस्थिती फक्त खासगीत कबूल करण्यात येत आहे. मविआ सरकार किती दिवसांत पडणार याचे अंदाज बांधण्याऐवजी ते टिकले तर महाराष्ट्राचे नुकसान किती होणार, याचे हिशेब आता सुरू झाले आहेत. याचे कारण म्हणजे मोठ्या प्रत्येक प्रकल्पाचा खर्च वाढत आहे. एकच उदाहरण हा मुद्दा स्पष्ट करण्यास पुरेसे आहे. मुंबई मेट्रोची कारशेड आरे संकुलात होऊ नये, अशी भूमिका मविआ सरकारने घेतली. आज त्यामुळे होणारी खर्च वाढ १०,००० कोटी रुपयांवर गेली आहे असा कयास आहे. हीच कथा बहुतेक महाप्रकल्पांची आहे. तरीही त्यावर चर्चासुद्धा होताना दिसत नाही. प्रकल्प पूर्तीच्या तारखा जाहीर करण्यात येतात आणि जातात. हाती काहीच पडत नाही. त्यामुळे एकीकडे लोक तर दुसरीकडे प्रशासन बेचैन आहेत. काम कमी आणि राजकारण फार हा कार्यक्रम सर्व पक्षीय नेत्यांनी स्वीकारलेला आहे. या सर्व गदारोळात कधी नव्हे ते राजभवनही घेरले गेले आहे. त्यामुळे महाराष्ट्राचे राजकारण सध्या भ्रष्टाचार या एकमेव आसाभोवती फिरत असल्याचे दिसत आहे.

मविआ सरकार बचावाच्या तर भाजपा आक्रमणाच्या भूमिकेत असून, या जात्यात सगळेच भरडून निघत आहेत ही वस्तुस्थिती आहे. एकमेकांविरुद्ध चौकशा लावण्याचे चक्र सुरू असून त्यामागची भूमिका लोकांना गोंधळात पाडत आहे. यातली जमेची बाजू म्हणजे एक प्रबळ विरोधी पक्ष नेता महाराष्ट्रास देवेंद्र फडणवीस यांच्या रूपाने लाभला आहे. मविआ सरकारचे कथित गैरप्रकार जगासमोर आणणे हे कर्तव्य त्यांनी अत्यंत प्रभावी पद्धतीने नुकत्याच संपलेल्या अधिवेशनात पार पाडले; ही वस्तुस्थिती आहे. आधीच आघाडीतील दोन मंत्र्यांना राजीनामा द्यावा लागलेला आहे आणि आणखी किती या रांगेत आहेत, अशी उघड चर्चाही सुरू आहे.

मुळातच सरकार चालवणे ही अवघड जबाबदारी असते. ती कोणता नेता कशी हाताळतो त्यावर त्याचा मगदूर ठरतो. ही तारेवरची कसरत ज्या नेत्यास जमते, तोच राज्याचा विचार करू शकतो. केवळ सत्ता किंवा पद यांच्या लोभाने जो नेता आपल्या विचारधारेस आणि तत्त्वास बाजूला ठेवतो, तो अल्पकाळ यशस्वी होतो. मात्र त्याचा दीर्घकालीन लाभ होत नाही.

सध्याचे मविआ सरकार तीन पक्षांचे आहे. अन्य विचारी पक्षांना एकत्रित ठेवणे हे मोठे दुष्कर काम महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी करोनाच्या संकटाला तोंड देत केले आहे. ही राजकीय उपलब्धी सोडता मविआ सरकारच्या बाजूने बोलावे असे फारसे सापडत नाही.

म्हणूनच असे नक्कीच म्हणता येईल की, आता महाराष्ट्राची राजकीय संस्कृती नव्या वळणावर आली आहे. समाजकारण थोडे आणि राजकारण फार हे सूत्र जवळपास सर्वांनीच अंगीकारले आहे. या काळात राजकीय भूमिका बदलत गेल्या. राजकारण आणि नैतिकता यांची फारकत झाली. भ्रष्टाचाराच्या माध्यमातून जे राजकारणी माखलेले होते, त्यांना अभय देण्याची प्रक्रिया सार्वत्रिक झाली.

अत्यंत सामान्य पार्श्वभूमी असलेले काही वर्षांत गब्बर झाले. अनेक विवाह करणारे पावन झाले. ही प्रक्रिया केवळ एखादा मतदारसंघ किंवा जिल्हा आपल्या ताब्यात राहावा यासाठी उद्दामपणे राबवण्यात आली. त्यातूनच अशा राजकारण्यांची धिटाई वाढत गेली. त्यांना राजकीय बिरुद लाभले. अशी प्रकरणे आता बाहेर येऊ लागली आहेत. आर्थिक गैरव्यवहार, अनैतिक खासगी आयुष्य आणि सत्ताप्राप्ती ही त्रिसूत्री अमलात आली. दिलेला शब्द राजकारणात पाळायचा नसतो, हे अभिमानाने सांगणारे मिरवू लागले. एकत्र निवडणूक लढवली तरी ज्यांच्याविरुद्ध आयुष्यभर लढा दिला, त्यांनाच सोबत घेऊन सत्तेत रमले. या खेळीत कोण दोषी आणि कोण फसले याचा निर्णय येत्या काळात जनता मतपेटीतून घेईलच. परंतु ही घसरण थांबवणे अत्यंत अवघड आहे यात शंका नाही.

एके काळी महाराष्ट्राची राजकीय संस्कृती प्रगल्भ होती. विरोधकांना बरोबर घेऊन जाणारी ही संस्कृती या राज्याने पाहिलेली आहे. राजकारण आणि लोकहित यांना स्वतःच्या मर्यादा होत्या. पण कोणत्याही परिस्थितीत राजकारणच केले पाहिजे असे धोरण नुकत्याच पार पडलेल्या विधिमंडळ अधिवेशनात दिसून आले. अर्थात यास जबाबदार राज्यकर्ते की विरोधक हा कळीचा मुद्दा आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक विरोधी पक्ष पक्षनेत्यांनी संकटाच्या काळी सरकारला समर्थन दिले असे सांगण्यात येते. आजच्या विरोधी पक्षनेत्यांची भूमिका तशी नसल्याची टीका करण्यात येते. मात्र ही टीका एकांगी आहे. पूर्वीचे मुख्यमंत्री विरोधी पक्ष अल्पसंख्य असला, तरी त्यास सन्मानाने वागवत. आज हा संवाद घडताना दिसत नाही. केवळ राजकीय स्वार्थ हाच सर्वपक्षीय उद्देश असल्याचे वातावरण निर्माण झाले आहे

महाराष्ट्राची सामाजिक आणि राजकीय जडणघडण पुरोगामी विचारातून झाल्याचे टाळ्या घेणारे विधान आता भ्रामक ठरत आहे. आज खुलेपणाने जाती-पातींचे राजकारण सुरू आहे. फुले, शाहू, आंबेडकरांचा वारसा सांगत स्वार्थाचे राजकारण करणारी ही संस्कृती झाली आहे. कोणता पक्ष कधी कोणत्या विचाराच्या पक्षाबरोबर जाईल, याची हमी कोणीच देऊ शकणार नाही.

राजकारणातील साधनशुचिता, नीतिमत्ता आणि निस्पृहता मावळायला सुरुवात फार वर्षांपूर्वी झाली. राजकीय पक्षांच्याच नव्हे तर, आम जनतेलाही आता ते अंगवळणी पडले आहे. त्यामुळे एखाद्या राजकीय नेत्याने शाब्दिक मर्यादाभंग किंवा बेकायदा कृत्य केल्यास त्याच्यावर त्याच भाषेत टीका करणे किंवा त्या नेत्यास आणखी बदनाम करणे यालाच हुशारी म्हणण्याचा प्रघात अलीकडे पडला आहे. याला कोणताच राजकीय पक्ष अपवाद नाही. फरक असेल, तर तो भाषेचाच.

दुर्दैव हेच की बेरोजगारी, शहरीकरण, महागाई, पर्यावरण किंवा सामाजिक अत्याचार अशा प्रश्नांवर चर्चाच होत नाही. या परिस्थितीस काही अंशी प्रसारमाध्यमेही जबाबदार आहेत. अधिक शिवराळ बोलणाऱ्यास अधिक प्रसिद्धी, गंभीर विषय मांडणाऱ्याकडे दुर्लक्ष अशी माध्यमसंस्कृती रुजत चालली आहे. एकंदरीतच सर्वांनी काळजी करण्यासारख्या दिशेने महाराष्ट्राचे राजकारण चालले असून, त्यात गुणात्मक परिवर्तन झाले नाही तर अनवस्था प्रसंग ओढवेल; हे सांगण्यासाठी कोणत्याही ज्योतिष्याची गरज नाही.

**दिलीप चावरे**

भ्रमणध्वनी : ९८६७५५७३२७

# आगीनपाखरू

## डॉ. गिरीश दाबके

आकाश नुसतं आभाळून आलं होतं. कोणत्याही क्षणी पाऊस कोसळू लागणार होता. अविरत अथकपणे आकाश पाझरत राहील. गोदावरी बेभानपणे, गुलाबी होऊन सुसाटत धावत सुटेल. तिचा आवाज गाभाऱ्यातील ऊँकाराप्रमाणे घुमत राहील. उंच झाडं, कौलं, छप्परं, पागोळ्या, रस्ते सगळंच जलमय होऊन जाईल. गळत्या पाण्याचे गज आपल्या भोवती उभे राहतील. मग कुठे जाणं नाही की, येणं नाही.

माडीवरच्या खोलीत खिडकीत आबा दरेकर गच्च अभाळाकडे पाहत स्वस्थ बसले होते. दुपारपासून चहा पिऊन पिऊन तोंडाची चव पार गेली होती. विडीचा धूर आसपास पसरला होता. .....

आभाळ गच्च होतं अगदी मनात दाटून येणाऱ्या कवितेसारखं. थोड्या वेळाने आकाश कोसळेल, संथपणे संततपणे कागदावर उमटणाऱ्या कवितेच्या ओळींप्रमाणे.

कविता...! कविता....!

खरंच ही कविता आपल्याजवळ नसती, तर आपण काय केलं असतं? कसे जगलो असतो? जिवंत राहिलो असतो, पण जगलो मात्र नसतो. दिवस काय कसेही गेले असते. मात्र प्रत्येक दिवस, व्यक्त न होणाऱ्या कल्पनेप्रमाणे काळजात ठुसठुसत राहिला असता. कविता सोबतीस नसती तर.....! ह्या नुसत्या कल्पनेनंही आबांचा जीव घाबरा झाला. आबांनी पुन्हा नकळतपणे विडी पेटवली. कडक धूर आत शरीरभर खोलवर फिरला. नाका–तोंडातून वलया वलयाने बाहेर पडला. बरं वाटलं! दूर कुठेतरी वीज कडाडली. कंदील फकफकला. आबा दोन हातांवर खुरडत खुरडत पुढे आले आणि फकफकणारा कंदील त्यांनी पुन्हा कोनाड्यात ठेवला. पुन्हा खिडकीत येऊन बसले. पावसाला अवदसा सुचली होती. खूळ लागल्याप्रमाणे पाऊस कोसळत होता आणि पंख लागल्याप्रमाणे वारा सुसाट होता.

आता कोणी येणार नाही. अशा कुंद पावसात आबा पार गुदमरल्यासारखे होतात.

गप्पा नाहीत, हशा नाही, ढोलकीची सुरेल कडकडीत थाप नाही. काही म्हणजे काही नाही. फक्त पाऊस, वारा आणि एकटेपणा. अशा कुंद वातावरणात एकट्या जीवाला काही सुचतही नाही. एकट्यानं लिहिणं आबांना कधी जमलंच नाही. चार मंडळी असावी. पायपेटीचा स्वच्छ सूर असावा. परश्याचा ताणलेला आवाज असावा की, मगच कविता अशी लखकन व झपकून बाहेर येते. पागे एकदा म्हणाले होते, ''आबा, तुम्ही जर ही गप्पाष्टके कमी केलीत ना, तर आणखी किती तरी कवनं रचाल तुम्ही.'' आबा हसले होते. '' पागे, या गप्पा आणि ही कवनं या दोन पायांवर तर जगतोय मी. नाहीतर पांगळा माणूस मी.... काय करणार? बसून असतो. कविता करतो. गप्पा ऐकतो.'' आबांना वाटलं खरंच कविता नसती, तर आपलं गरीब आयुष्य अगदीच कंगाल आणि दरिद्री झालं असतं. कविता आहे म्हणून तर पागे भेटले, म्हसकर भेटले, दातार भेटले, बाबाराव सावरकर भेटले आणि....

म्हसकर आणि पागे....दोन शरीरं मात्र एक आत्मा! म्हसकर कमी बोलणारे, हळू बोलणारे, तोलून मापून हसणारे आणि पागे अघळपघळ बोलणारे...सातमजली हसणारे. दोघेही वास्तविक सरकारी नोकर. पण ब्रिटिशांबद्दल त्यांच्या काळजात अशी कटूता की... शक्य असतं तर... आणि बाबाराव...एक वेगळंच मिश्रण... देशभक्ती रोमारोमात भिनलेली. मात्र अंतरात्मा अध्यात्मात वेढलेला. त्यात पुन्हा नाटकाची आवड आणि या सगळ्यांना सांभाळून घेणारे एका दुव्यात बांधून ठेवणारे दातार. ही सगळीच तरुण मंडळी देशभक्तीने पेटलेली होती, भारलेली होती. सगळेच आबांच्या प्रेमात होते.म्हसकर पाग्यांचे 'राष्ट्रभक्त समुह मंडळ'! आबा आजवर फक्त ऐकून होते. त्यांना अप्रूप होतं ते बाबांच्या आध्यात्मिक अनुभवांचे! नाटकांच्या गप्पांचे! समोरच्या बोळातून वारा गरगरत फिरला. आबांना नाटकाच्या वेळी वाजणारा गंभीर ऑर्गन आठवला. बाबारावांच्या पाठंगुळीवर बसून किती वेळा... आबांनी पुन्हा विडी पेटवली. धुपाचा वास आठवला. विडीच्या ठिणगीकडे पाहात...

पागे म्हणाले होते, ''आबा, विनायकला भेटा एकदा. त्याच्या नजरेत ठिणगी नाही...आख्खा वणवाआहे वणवा...! परवा तो म्हणाला...''

विनायक... विनायक...

अनेकांच्या तोंडी हेच नाव. त्याचेच शब्द. त्याचेच विचार. विनायकाने नवीन शब्द आणला. 'स्वातंत्र्यलक्ष्मी...' शब्दलोभी आबा या शब्दावर भाळले. तो शब्द त्यांनी पुन: पुन्हा उच्चारून पाहिला. लोभी माणसानं

कनवटीचा बंदा रुपया पुनः पुन्हा चाचपून पाहावा, त्याप्रमाणे आबांनी तो शब्द अनुभवला, भोगला. हा शब्द ऐकला आणि आबांना वाटलं...उठावं आणि धावत जाऊन विनायकला...

पण... ते शक्यच नव्हतं. आणि विनायकच्या पायाला तर चाकं बसवलेली होती. नाशकात वेगळेच वारे वाहू लागले होते. ते साधे वारे नव्हते...वादळवारे होते. मध्येच कोणीतरी सांगितलं की, विनायक कविताही करतो. मग मात्र आबा विनायकच्या भेटीला आतूर झाले. कोणीतरी म्हणे साहेबाची स्तुती करणारी कविता केली... तर...तर...? विनायक ताड्कन म्हणाला, ''ही कविता म्हणजे डुकरासमोर मोत्यांचा चारा टाकावी तशी आहे.''

पण...

ती कविता झेपेल आपल्याला? कालीमातेसारखी भीषण....रुद्रासारखी भयंकर कविता झेपेल आपल्याला? आपण असे....पांगळे.... क्षणभर आबा घाबरे झाले. स्वतःवरच थुंकावं असं वाटलं... कसनुसं झालं.

पुन्हा एकदा एक विडी पेटली.

खाली कोणाची तरी चाहूल लागली. आबांना आनंदाचं उधाण आलं. खालून पाग्यांचा दणदणीत आवाज आला, ''आबा, आहात का? पाहुणा घेऊन आलोय.''

''या. या. तुमचीच वाट पाहत होतो. पाहुणा कोण आहे?''

पागे आले. पाहुणा आला.





आबांना विनायकचा हा त्वेष आणि द्वेष आवडला. त्याची उपमाही आवडली. त्याने म्हणे क्रांतीची शपथ घेतली आहे. परवा कोणीतरी विनायकनं रचलेला चाफेकरांचा पोवाडा म्हणून दाखवला. आबा थरारून ऐकत होते. कविता अशी असू शकते? कविता अशी असते! एकेक शब्द कसा तलवारीच्या धारेसारखा... विजेच्या लखलखाटासारखा... गंगेच्या प्रवाहासारखा... आबांना क्षणभर स्वतःच्या कवितांची लाज वाटली. कसली ती आपली कविता? चावनट...! ढोलकीच्या ठेक्यावर कंबर लचकवणाऱ्या बयेसारखी... शीऽऽ!

ये बाबा...एकदा तरी भेट...तुझी कविता दाखव. मी माझी प्रतिभा पणाला लावेन, शब्दकळा तुझ्यासाठी उधळेन. मला तुझ्यासारखी कविता दाखव...

आबा पाहत होते. झगझगीत गोरा वर्ण. बारकुडा वळखर बांधा. किंचित मोठं वाटणारं घवघवीत डोकं आणि नीळसर झाक असलेले डोळे... असे डोळे त्यांनी कधी पाहिलेच नव्हते. नाही... त्या डोळ्यांना उपमाच नव्हती. अवघी शब्दकळा मूक झाली आणि कवित्व पांगळे झाले.

पागे हसले. आबा भानावर आले. क्षणात लख्कन समजले, ''अरे हा विनायक...!''

विनायक पुढे झाला. लाघवी हसत सौम्यपणे म्हणाला, '' आबा, मी विनायक. बाबारावांचा धाकटा भाऊ.'' आणि खाली वाकत म्हणाला, ''आबा, नमस्कार करतो हं!''

बाहेर वीज तेजाळली. खोली लखलखली. नकळत डोळ्यांतून आसवं पाझरली का ते आबांना कळलं नाही. ती रात्र धन्य होती. विनायक बोलत होता. क्रांती, स्वातंत्र्य,

स्वधर्म, स्वदेश, स्वातंत्र्यक्ष्मी. शेकडो वेळा ऐकलेले शब्द....पण विनायकच्या तोंडून ऐकताना...कसे तेजाळून जात होते. चैतन्याने लवथवत होते. विनायक केवळ ओठांनी बोलत नव्हता. त्याचं अवघं अस्तित्व बोलत होतं. आत्मा बोलत होता. बाहेर गंगेला महापूर आला होता. अवकाश विजांनी भारलेलं होतं.

''पण विनायक, ही क्रांती, स्वदेशभक्ती मला कशी जमेल? मी हा असा, तुला माहीत आहेच...''

''आबा, तुम्हाला जमणार नसेल, तर जगात कोणालाच जमणार नाही. आबा तुमच्याजवळ कविता आहे. अहो, कविता म्हणजे शब्दांचा सारीपाट नव्हे की, प्रास–अनुप्रासांच्या आट्यापाट्या नव्हेत. कविता म्हणजे आत्म्याचा आविष्कार असतो. कवीचा श्वास असतो. आबा, स्वातंत्र्यसूर्याचे सारथी व्हा. मग तुमचा पांगळेपणा लोकांना तर सोडाच, तुम्हालासुद्धा आठवणार नाही. आबा सूर्याचा सारथी पांगळा असला, तरीही सूर्य तेजस्वीच असतो.''

आबा ऐकत होते. पाहत होते. आता खोल काहीतरी उमलत होते. प्रकाशत होते. उजळत होते. विशालत होते.

नंतर दिवसांना कशी गती लाभली. मित्रमेळ, सभा, भाषणे, घोषणा, शपथा, मेळे, आबांच्या कविता. ''रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले?''

आबा झपाटून लिहित होते. मेळे गाजत होते. नाशिक गर्जत होते. साऱ्या समाजाची स्वातंत्र्यलालसा जणू आबांच्या लेखणीतून उसळत होती. तमाशे मागे पडले. वग, बतावण्या, सवालजवाब परशा तासनतास बसायचा. त्रासून कंटाळून निघून जायचा.

मेळे...सभा... शपथा... क्रांती...

विनायक खूप मोठ्ठा झाला. पुणे...लंडन... अभिनव भारत...१८५७चे स्वातंत्र्यसमर, मदनलाल धिंग्रा... महाराष्ट्रातील अभिनव भारताच्या शाखा...पिस्तुलं... बाबारावांची धावपळ... अटक... छळ... हरामखोरांनी बाबारावांना बर्फाच्या लादीवर झोपवले...वीजेचे झटके दिले...नाशकातून चोर दरोडेखोराप्रमाणे फिरवले...अपराध तो काय त्यांचा? तर..तर.. त्यांनी आबांच्या कविता प्रकाशित केल्या...तीस कविता...आणि शिक्षा काय? तर अंदमान... काळेपाणी... जन्मठेप... आबा पार चुरगळून गेले. क्रांती करताना या वेदनापर्वाची अपेक्षा होतीच... पण चटका! ...अपेक्षित काय आणि अनपेक्षित काय... दाह होणारच. वेदना उसळणारच! हरामखोरांनी सावरकरांच्या घराला खणती लावली. अक्षरशः घर खणून काढले. आबा व्याकूळ झाले. विनायक अटक झाला. मार्सेलीस... नासिक खटला... मित्रांची ससेहोलपट...पार वाताहात...

पाऊस कोसळत होता. धारांचे गज, एकटा एकांत. आता कोणी येणार नाही. येण्यासाठी कोणी उरलंच नाही. पागे, म्हसकर, दातार,भट... सावरकर बंधू... तिकडे दूर अंदमानात... कोलू...वेत... रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले?

गंगा फुफाटत होती.

आबांना वाटलं...लढलात तुम्ही... मी फक्त शिंग होतो. गंगाप्रवाहात मीदेखील माझा दीप सोडला. दुबळा होता तो. मात्र शब्दांनी तारला त्याला. स्वातंत्र्यलक्ष्मी या मंत्रानं तारला त्याला. नाहीतर कोठेतरी कोपऱ्यात लावण्या रचत बसलो असतो. चावनट काव्य आणि शृंगार...शब्दांचा नुसता सारीपाट...प्रासांच्या आट्यापाट्या... विनायक भेटला...सगळंच बदललं... नखशिखांत बदललो. माझी मलाच ओळख पटू नये एवढं परिवर्तन....सुरवंटातून आगीन पाखरू जन्माला आलं. फुलून आले. क्रांतीची ज्वाळा. माझे शब्द, हीच माझी भूमिका. हेच माझे दीपदान... माझी आठवण राहील न राहील..मात्र माझी कविता नक्की राहील. एक तमासगीर ते स्वातंत्र्यकवी. कवी ते क्रांती...

कविता...

पाऊस कोसळत होता. वीजांचे तांडव. थकलेली कुडी. श्रांत कुडी. बस खूप झालं आता. एका आयुष्यात शक्य असतं तेवढं मी नक्कीच केलं. मनापासून केलं.

आबांच्या मनात शब्द उमटत होते, ''सुंदर मी होणार...नवा पिसारा, नवा साज मला लाभणार...सुंदर मी होणार.''

■

**डॉ. गिरीश दाबके**
हरिद्वार सोसा. दफ्तरी मार्ग, स्कूल लेन,
मालाड (पूर्व), मुंबई–४०००९७.
girishdabke@gmail.com
सहध्वनी : ०९७६८०२१८४५

# चित्रपट आणि तुम्ही-आम्ही

**मनोज आचार्य**

जीवन काय आहे? किती आदिम प्रश्न आहे. कदाचित तितका आदिम जितकं की जीवन, मात्र तरीही याचं उत्तर अजून कुठे मिळालंय? कोण शोधू शकलंय? कोणीतरी म्हणालंय– ''जिंदगी हसीन है, नजर उठाके तो देखो.'' तर कोणी असंही म्हटलंय– ''सौ ग्राम जिंदगी है, जी भर के जी है'' आणि ते खरंही आहे, जीवन जगण्याची मजा साधेपणाबरोबरच, आनंद, उत्साह आणि सकारात्मक दृष्टिकोनातही आहे. त्याला ओझ्याचं रूप दिलं हेव्यादाव्यांनी, ताण–तणावांनी बस्स–जगणं काय, अकारण जवळ करा. सगळीकडे मिट्ट काळोख, एकही खिडकी उघडी नाही. हवेचा श्वासही ऐकू येत नाही, नेमकं तेव्हाच दूर कुठेतरी एक छोटी दिव्याची ज्योत नजरेस पडते. आणि आवाजांची गूज कानी पडत हळूहळू प्रकाशाची आभा पसरू लागते.

त्यावेळी तुम्ही म्हणाल– ''अरे, हे तर चित्रपटगृहातील दृष्य आहे. हो, अगदी अशाच स्थितीचा सामना एखाद्या नवजात बालकाला जन्म घेताना करावा लागतो.'' हेच उदाहरण पुरेसं नाही. ताण–तणावात, विचलित अवस्थेत,






ओझं झालं... म्हटलं तर प्रश्न हाही निर्माण होतो की, जीवन जगण्यात योग्य तर्क नसेल तर अर्थ काय उरेल, जीवनाचा हेतू काय राहील, जीवनाचा अर्थ काय होईल, एखादी गोष्ट सारखी उच्चारली तर ती खरी होऊन जाते, याच विश्वासाने आपण परत म्हणू शकतो–जीवनाचा अर्थ आहे त्याचे सुंदर असणं. आणि ते दुसऱ्यांबरोबरच बेलाशक आपल्याही कामी यावं. आपलं असणं जर आजूबाजूच्या वातावरणास प्रसन्न ठेवत असेल, स्वतःला तसेच आप्तांना आनंद देत असेल तर तीच खऱ्या जीवनाची ओळख आहे. तसं म्हटलं तर सुंदर असणं याचा अर्थ, चमकदार, अत्यंत स्वच्छ, सुंदर त्वचा आणि त्यावर दागिने असणं म्हणजे सुंदर नाही. खरी सुंदरता हृदयात चांगले आणि स्वच्छ, नितळ भाव असण्याने प्रगट होते व ते भाव चेहऱ्यालादेखील उजळून टाकतात. विश्वास नाही बसत... थोडं, सहजपणे खळखळून हसून बघा, आजूबाजूचा सगळा अंधार पळून जाईल. जीवनाला खरं ओळखायचं असेल तर अंधाराला भ्रमनिराशा ओलांडून, जेव्हा एखादी व्यक्ती त्यातन बाहेर येते, तेव्हा तीदेखील अंधकाराकडून प्रकाशाकडे जात असते. त्यामुळे एखाद्या गर्भस्थ शिशुसाठी अंधाराचा अर्थ निराशा असा नसून अंधार हा त्याच्या स्वतःच्या विकासासाठी अत्यंत जरुरी असणारी प्रयोगशाळा आहे. वेगळ्या अर्थाने कोणत्याही व्यक्तीसाठी ताण–तणाव, भ्रमावस्था तसेच समस्येचा अंधारसुद्धा अत्यंत जरुरी असणारी गोष्ट आहे. कारण त्या सर्वांना पार करूनच त्याचा नवा जन्म होणार असतो. या रीतीलाच धरून आपण असं म्हटलं की, चित्रपटगृह आणि मानवी जीवन एक–दुसऱ्याशी पुरक असेच आहेत. तर तुम्हाला क्षणभर हसू येईल; मात्र ही तुलना चुकीची निश्चितच नाही.

चला, स्वतःच अनुभवून बघा. चित्रपटगृहात दाखल होण्यासाठी प्रथम गर्दीचा एक भाग बना, धक्काबुक्की करत आत प्रवेशण्यासाठी तुम्ही किती आणि कशी धडपड करता हे न्याहाळा. तेव्हा तुम्हाला जाणवेल एखाद्या भ्रुणाचादेखील

यशस्वी प्रवास अशाच प्रयत्नांचा असतो. जाऊ दे, पुढे जाऊ. जसं मघाशी मी म्हटलं की, चित्रपटगृहात पसरलेल्या अंधारातदेखील प्रकाशाची एक यात्रा सुरू होते. त्यावेळी आपल्या मनाचा कॅनव्हास कोराच असतो. तेव्हा त्यावर हळूहळू प्रकाशाची रांगोळी तयार होत आजूबाजूला रंग पसरत जातात. एक गोष्ट आपण पाहायला लागतो. शब्द, संगीत, सूर, आवाज आणि वेगवेगळे भाव, रोजचं जगणं, अतृप्त इच्छा, थोडा ताण, हसू, काही अश्रू, पाऊस, दुष्काळ, सकाळ, संध्याकाळ, चंद्र... म्हणजे अगदी माणसाला जरुरी असणारं सगळं जीवन एकामागून एक दृष्य माध्यमातून प्रगटतं. आपला अर्थ समजावतं. अगदी उत्कंठता शिगेला पोहोचलेली असतानाच, काही क्षणांसाठी विराम मिळतो. ज्याला आपण मध्यांतर म्हणतो.

जीवनशैली समजून घ्यायची असेल, तर चित्रपटगृहात एखादा चित्रपट बघण्याचा अभ्यास किती सुयोग्य ठरतो नाही! जीवन अगदी असेच घडत असते. एक सरळ साधी गोष्ट. बालपण, वेगवेगळे खेळ, छोट्या–छोट्या इच्छा, छोटी स्वप्न, वाळूची घरं, त्यांना तयार करतानाचा उत्साह, कोणाच्या मनात ती पाडण्याची मस्तिखोर इच्छा मग शाळा, कॉलेज, शेवटी नोकरी किंवा व्यवसाय, लग्न आणि मुलं असं घडत असतानाच मध्यांतर त्यावेळी काही करण्यासारखं नसतं. मात्र मध्यंतरानंतर चित्रपट जेव्हा सुरू होतो तेव्हा लक्षात येतं की पुन्हा काहीतरी नव्याने सुरू झालेलं आहे. आपल्या वास्तवातील जगण्यातही हेच असतं की, फक्त चित्रपटात क्लायमेक्स, ठरवून लिहिलेले संवाद, परिस्थिती आणि त्यांच्यासाठी तयार केलेल्या रचना असतात. वास्तव जीवनात हे नसतं. तरीही चित्रपट आणि आपले जीवन एका समांतर रेषेत एकावेळी असतही व नसतही म्हणून या दोहोतील नातं फार महत्त्वाचं आहे. या नात्याला आता शंभर वर्षांहून अधिक वर्षे होत आहेत त्यानिमित्ताने...

कधी कधी माणसं स्वप्नात काही अशी विलोभनीय दृश्य पाहतात की, ती दृश्य आयुष्यभर विसरू शकत नाहीत. वा त्यांना विसरण्याचेही मनात आणत नाही. त्या माणसांत जर एखादा लेखक असला तर तो त्यावर कथा लिहितो, चित्रकार असेल तर तो कॅनव्हासवर उतरवतो. कवी, गीतकार असेल तर कविता, गीत लिहितो. एखाद्या जवळ प्रचंड पैसा असेल व व्यावहारिक दृष्टिकोनाबरोबरच त्याची कल्पनाशक्ति चांगली असेल, तर तो ही स्वप्नातील दृश्य मोठ्या पडद्यावर साकारून जनतेपर्यंत पोहतवण्याचा प्रयत्न करतानाच; हेही दाखवतो की स्वप्नातील दृश्य कल्पनेमार्फतच किती सुंदर करता येतात.

स्वप्नदेखील शेवटी काय आहे? सगळा कल्पनेचाच खेळ आहे. मात्र या क्लपनेच्या खेळात इतर कल्पनांपेक्षा अधिक जिवंतपणा आहे. प्रत्येक कलेप्रमाणेच चित्रपटदेखील वास्तव, कल्पना आणि स्वप्न यांचा संयुक्त आविर्भाव आहे. त्याचबरोबर दर्शकांच्या मनात नवीन स्वप्नांची रुजवण करणाराही आहे. हाच दर्शक जेव्हा आपल्या घरी झोपलेला असतो तेव्हा तो कुठे ना कुठे चित्रपटात पाहिलेली सुंदर स्वप्नं सुद्धा उधार घेऊन पाहत असतो. त्यामुळे स्वप्न ते चित्रपट आणि चित्रपट ते स्वप्न या प्रवासात चांगल्या, वाईट दृश्यांचं येणं–जाणं हा क्रम चालूच असतो. काळानुरूप स्वप्न बदलतात त्याचबरोबर सौंदर्यानुभूतीदेखील बदलते. कारण समाज बदलतो तसे विचार बदलतात. आणि या साऱ्यांच्याबरोबर बदलत असतो चित्रपटाचा सौंदर्यबोध. चित्रपट माध्यमाचे मूळ स्वरूपच मुळी स्वप्नांची बाग आहे. स्वप्न ती जी जागृतावस्थेतही पाहता येतात आणि झोपेतही. ती पूर्ण करण्यासाठी आपण आयुष्यभर झुंजत असतो. मात्र स्वप्न नावाच्या बागेतील फुलं सतत रंग बदलत असतात व काळानुरूप सौंदर्याचा नवा अर्थ तुमच्या दृष्टीला देत असतात. उदाहरणादाखल पाहायचे असेल, तर आजवरच्या चित्रपटाच्या कालखंडावर ओझरती नजर टाकून पाहा. तुम्हाला त्याचे उत्तर नक्कीच सापडेल. चित्रपटाच्या सुरुवातीपासून ते आजवर त्याच्या सादरीकरणात आणि विषयात, त्याच्या एकूण बाजार मूल्यात नजर टाकली तर लक्षात येईल की सामाजिक, आर्थिक परिस्थितीनुसार तो बदलत गेला आहे. त्याच परिस्थितीनुसार लोकांचीही पसंद बदलत गेली आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील चित्रपटांच्या कथा पाहा त्यातले सौंदर्य पाहा. त्यावेळचा समाज हा विदेशी ताकदीसमोर झुकलेला आहे. त्यांना त्यातून बाहेर कसे बाहेर काढून ताठ मानेने उभं करता येईल हे पाहिलं जायचं. त्यामुळे त्यावेळचा सिनेमा म्हटलं तर जन–जागृती व चारित्र्य घडवणारा होता असे म्हणता येईल. उदाहरणार्थ पाहा अछूत कन्या (१९३६), चित्रलेखा (१९४१) रोटी (१९४२), किस्मत (१९४३), बडी मां (१९४५), जुनून (१९४७). तर स्वातंत्र्योत्तर काळातील चित्रपट हा राष्ट्रीय पुर्नजागरणाचा होता. एक नवी व्यवस्था, संपूर्ण जगाच्यापेक्षा वेगळ्या अर्थनीतीनुरूप नवीन–जुन्याचे मिश्रित संस्कार घेऊन आलेला चित्रपट होता. त्यातला नायक हा जबाबदार, चारित्र्यवान, देशभक्त, आदर्शवादी, संस्कारी तसेच प्रगत दृष्टिकोन असणारा असायचा. नायिकादेखील घराचा उंबरठा ओलांडून काही करू इच्छिणारी अशी दाखवली जायची अर्थात तिच्या मार्गात अनेक अडचणी असायच्या तरीही त्यावेळच्या सामान्य महिलांना प्रेरणा देणारी होती. म्हणून त्यावेळचा चित्रपट हा समाजवादी स्वप्नांच्या अंगाने काही देणारा होता. पुढे हातात आलेल्या सत्तेमुळे हळूहळू आपण

आपली मूल्य विसरायला लागलो आहोत यावर भाष्य करणारा चित्रपट येऊ लागला होता. आवारा (१९५१), दो बिघा जमिन, पतिता (१९५३), जागृती, बूट पालिश (१९५४), श्री ४२०, आजाद (१९५५), मदर इंडिया, प्यासा (१९५७), जिस देश में गंगा बहती है, काला बाजार, अनुराधा (१९६०) हे चित्रपट तेच सौंदर्य पेरत होते जे त्यावेळच्या समाजाच्या स्वप्नातील होतं.

भारतीय कथेत मग ती चित्रपटाची असो वा नाटकाची त्यात प्रेम ही संकल्पना प्रमुख असायची. नेहरु युगानंतरच्या काळातील चित्रपट हे अधिकतर याच संकल्पनेशी जोडलेले होते. आणि त्यांनी अधिक काळ व्यापलेला होता. गोरी, कमनीय बांध्याची, अल्लड, देखणी नायिका व तिच्यावर लट्टू झालेला नायक याच दोन पात्रांच्या भोवती चित्रपट कथा फिरायची. अशा प्रकारच्या चित्रपटांत कधी गंभीरपणात तर कधी नाच-गाणी, तर कधी नुसता धुडगूस असायचा. त्या काळातील मेरे मेहबूब, बंदिनी (१९६३), संगम, आई मिलन की बेला, काश्मीर की कली (१९६४), वक्त, जब जब फूल खिले, गाईड, मेरे सनम (१९६५), तीसरी कसम (१९६६), नीलकमल (१९६८) पत्थर के सनम, दो रास्ते (१९६९) हे चित्रपट प्रेम या संकल्पनेभोवती फिरणारे असले तरी त्याचे रंग व सौंदर्य निरनिराळे होते.

७० ते ८०च्या दशकात एकूण समाज सुरुवातीच्या समाजवादाकडून भांडवलशाहीकडे जात होता. त्याचे प्रतिबिंब त्या काळातील पूरब और पश्चिम (१९७०), आनंद, हरे रामा हरे कृष्णा, मेरा गांव मेरा देश (१९७१), पाकिजा, बावर्ची, परिचय (१९७२) या चित्रपटांतून एका वेगळ्या पद्धतीने दिसले.

८० ते ९० च्या दशकात अतिशय वेगवेगळ्या विषयांचे चित्रपट आले. ते एकाचवेळी प्रगत तसेच रूढींच्या मुळांचे सिंचन करणारे होते. काही चालू सौंदर्यबोधाचेही चित्रपट याच काळात आले. मात्र इथवरच्या प्रवासात दोन प्रवाहात चित्रपट विभागले गेले होते. एक म्हणजे व्यावसायिक, दुसरे समांतर. यांची सुरुवात खरी तर ७०-८०च्या दशकातच झाली होती. ती ८०-९०च्या दशकात विस्तृत झाली. या काळापर्यंत चित्रपट हे कोणत्याही खास वर्गाच्या अभिरूचीसाठी तयार होत नव्हते. त्यामुळे याकाळातील चित्रपटांचे देखणेपण हे सर्वांपर्यंत पोहोचावे तसेच त्यांच्या स्वप्नांचा एक भाग व्हावे, अशा पद्धतीचे होते. मात्र ८०-९०च्या काळात हिंदी चित्रपटाच्या इतिहासात एक अशा पर्वाची सुरुवात होत होती की, या काळातील काही चित्रपट हे विशेष वर्गासाठी त्यांच्या अभिरूचीचा विचार करून तयार होत होते. त्यात व्यावसायिकतेचा विचार न ठेवता कलेसाठीचा विचार असायचा. त्यात वैयक्तिक सौंदर्यानुभूतीचा समावेश होता. जी अनुभूती समाज बदलण्याच्या आकांक्षेने भारलेली होती. हे चित्रपट विकसित मानव संबंधांची स्वप्न दाखवणारे होते. यात सत्यजीत रे, मृणाल सेन, श्याम बेनेगल, मणि कौल, गोविंद निहलानी, ऋत्विक घटक, सईद अख्तर मिर्झा, सई परांजपे, प्रकाश झा, मीरा नायर, दीपा मेहता सारखे असामान्य प्रतिभेचे दिग्दर्शक अग्रेसर होते. यांनी हिंदी चित्रपटांत वास्तववादी सौंदर्याचा पाय रचला. भारतीय प्रादेशिक चित्रपटातही असे अनेक रथी-महारथी आहेत त्यांनीदेखील काही नाविन्यपूर्ण देण्याचे यशस्वी प्रयत्न केले हे विसरता येणार नाही.

९०च्या दशकातील आणि त्या पुढील दोन दशकांतील चित्रपट बारकाईने पाहिले तर ते सर्वार्थाने बदललेले आहेत. याचे कारण लोकांची स्वप्ने मोठ्या वेगाने बदलत आहेत. त्याच वेगाने नैतिकतेचे अधःपतनसुद्धा व्हायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे पसंतीत-नापसंतीत जमीन-अस्मानाचे अंतर आहे. जागतिकिकरणामुळे व्यवसाय तसेच रोजगारात नव्या संकल्पना, नवी दिशा जन्म घेत आहेत. भारतीय सिने-बाजारात परदेशी चित्रपट वेगाने येऊन थडकत आहेत. त्यामुळे चित्रपटांनी तेवढ्याच वेगात लोकांच्या स्वप्नातील, वास्तवातील सौंदर्याची समीकरणं बदलायला सुरुवात केली आहे. त्याचबरोबर परदेशी सिने-बाजारातदेखील भारतीय चित्रपटांना स्थान मिळायला लागले आहे.

१९९३ नंतर चित्रपट एकूणच संकल्पनेने बदलतच गेला हे बदल तांत्रिक बाजूबरोबरच अनेक अंगांनी होते. यात एकीकडे भव्यता आणण्याचा सोस होता. तर दुसरीकडे सामाजिक प्रश्नांद्वारे लोकांना सजग करण्याचा प्रयत्नही होता. मात्र तो व्यावसायिक बाजू सांभाळून. इथे चित्रपटांची उदाहरणादाखल नावं देण्याची गरज भासत नाही. ते चित्रपट तुम्ही डोळ्यांसमोर आणून ते बदल स्वतःचं अनभवू शकता.

मात्र अगदी आजचा चित्रपट योग्य-अयोग्य, नैतिक-अनैतिक आणि उचित अनुचित यांच्या फेऱ्यात सुंदरतेचा बोध देण्याचे टाळतो आहे. त्यामुळे तो बऱ्याच वेळा विकृत स्वरूपात समोर येतो आहे. याला कारण आहे चांगल्या सशक्त कथांचा अभाव. यात साहित्यकारदेखील दोषी आहेत. त्यांनी चित्रपटाला आपलं कधी मानलंच नाही. शेवटी चित्रपट हे माध्यम दृक-श्राव्य माध्यम आहे. त्यामुळे साहित्यकारांनी आणि निर्मात्यांनी माध्यमाची गरज समजून व आपआपल्या माध्यमाची बूज राखत आवश्यकतेनुसार आपल्या विचारांना मुरड घातली, तर आजही चांगले चित्रपट निर्माण होऊ शकतात. शिवाय आज चित्रपटाची तांत्रिक बाजू सशक्त आहे. प्रचार-प्रसारात मोठे परिवर्तन आलेले आहे. मार्केटिंगचे तंत्र बदललेले आहे. पोस्ट-प्रोडक्शवर अधिक लक्ष दिलं जातं आहे. या साऱ्या

चांगल्या बदलांच्या जोडीने आपला चित्रपट जगभरात पोहोचू शकतात. हेच नेमकं गंभीरपणे पाहिलं जात नाही आहे. ते पाहिलं जाणं आजची गरज आहे.

जी कथेची तीच व्यथा चित्रपट संगीताची. भारतीय चित्रपटाचे सगळ्यात मोठे वैशिष्ट्य म्हणजे कथेच्या बरोबरीने येणारी गाणी व त्यांच्या स्वर–रचना. त्यांचा विचार चित्रपटाची कथा आकार घेत असतानाच केला जातो. हे जगभरातील चित्रपटात होत नाही. भारतीय चित्रपटाच्या इतिहासाचे प्रत्तेक पान चाळताना तुम्हाला स्वर आणि तालाची चाहूल जाणवेलच. त्याशिवाय पुढचं पान उलटलंच जाणार नाही. हिंदी उर्दूतील अनेक सुप्रसिद्ध शायर आणि प्रतिभावंत संगीतकारांनी चित्रपट युगाच्या सुरुवातीच्या काळापासून अनेक दशकं अक्षरशः गाजवली त्यांनी केलेले काम आजच्या पिढीच्या तोंडीदेखील येतं. हे सारं थक्क करणारं असंच आहे. पन्नास–साठचं दशक तर चित्रपट संगीतासाठी सुवर्णयुग समजलं जातं. मात्र आजती स्थिती पाहिल्यानंतर तो काळ का लोपला? असंच मनात येतं. आज काही चांगले प्रयोग ए. आर. रहेमान, इस्माईल दरबार, शंकर एहेसान यासारखे संगीतकार करीत आहेत. तरीही उणीव भासतेच कारण आज संगीत देणारे बरेच, काही अपवाद सोडता सुमारांमध्येच मोडणारे आहेत. पूर्वी सी ग्रेडचा संगीतकारदेखील गुणी असायचा याचे कित्तेक दाखले देता येतील. आजच्या गीतकारांच्या बाबतीतदेखील गुलजार यांच्यासारख्या जुन्या–जाणत्या बरोबर अलीकडचे स्वानंद किरकिरे, प्रसून जोशी सोडले तर बाकी अंधारच आहे.

खरंतर आजच्या घडीला अर्थात एकवीसाव्या शतकात अनेक नवीन तंत्र विकसित झालेली असताना चित्रपट अनेक अंगानी फुलायला हवा होता. तसं क्वचित प्रसंगीच होताना दिसतंय. हे चित्रपटकर्त्यांना सांगण्यासाठी चित्रपटाची सुयोग्य समीक्षा व्हायला हवी, शोध घ्यायला हवा. तरच आजच्या चित्रपटाला योग्य दिशा मिळू शकेल. हे मात्र होत नाही. आपण त्यात निश्चित मागे आहोत. काही वृत्तपत्रात चित्रपटाच्या नावाखाली जे लिहिलं जातं (काही अपवाद सोडता) ते इतकं उथळ असतं, की लोक त्यालाच समीक्षा समजू लागले आहेत. त्याचा ही परिणाम चित्रपटावर होतो. या माझ्या सांगण्यात कुठेही नकारात्मक सूर नाही. सांगतो आहे ते जे वास्तव दिसतंय तेच सांगतो आहे. आज बऱ्याचवेळा रिमेक चित्रपट–कल्चर आलेले आपण पाहतो. अर्थात ते आधीच्या काळातही तशा पद्धतीने तयार होत होते. नाही असं नाही. मात्र मला हा चांगला ट्रेंड वाटत नाही. हे तर बुद्धी दारिद्र्य आहे. कारण काही गोष्टी या एकदाच निर्माण होण्यासाठी आलेल्या असतात. त्याची पुनः पुन्हा निर्मिती केली, तर त्याचे सौंदर्य नष्ट होते. त्यात बदल जरी करायचे झाले तरी ते फार विचार करून करावे लागतात. आणि ते बदल समजून घेण्याइतपत आपला प्रेक्षक प्रगल्भ निश्चित नाही. जर तुम्ही जुन्या क्लासिक सिनेमांची रिमेक करण्याऐवजी डिजिटल स्वरूपात मात्र आजच्या रंगीत पद्धतीत हुबेहूब पेश केलेत, तर कदाचित काही प्रमाणात प्रेक्षक त्याचे स्वागत करतात. कारण हिंदी चित्रपटाची गाणी, दृश्य, कथा, चरित्र वर्षानुवर्ष, दशक ते दशक आपल्या मनात अमर झाली आहेत. देवानंदचे मोहक हसणे, राजकपूरचे आपल्याला स्वप्नात रमवणारे मन, दिलीप कुमारचा भलेपणा, नरगीसचा, नूतनचा निर्मळपणा, मीना कुमारीचे दुःख, मधुबाला, वहीदाची सौंदर्यपूर्ण अदा स्मिता, शबानाचा सशक्त अभिनय आणि अमिताभचा विद्रोह, त्याचबरोबर आमिरची सामाजिक जाण हे सारं मिळून आपल्या आत जीवन सौंदर्याची ज्योत कायम जळत राहणार आहे. चित्रपटाच्या शंभरी ओलांडण्याच्या निमित्ताने ही भावना अधिक जाणवत आहे. आजच्या घडीस हिंदी चित्रपटाने आपली शंभरी पूर्ण केली आणि अधिक काळ लोटला आहे. या काळातही आणि गत काळातही देशाच्या नवीन व जुन्या पिढ्यांचा भावनात्मक विकासाचा प्रवास हा चित्रपटाच्या बरोबरीनेच झाला आहे, हे विसरता येत नाही...

आजवरचा चित्रपट हा सामान्य जनतेपासून उच्च वर्गीय जनतेपर्यंत एक वेगळ्या अंगाने साहित्य बनून राहिला. एका क्षणासाठी विचार करा चित्रपट माध्यम नसते तर आपला भारतीय समाज कोणत्या सांस्कृतिक शून्यात जगत असता! चित्रपट आपल्या मनातील एक सुप्त इच्छा आहे, जी आपण सारे जगू पाहत असतो. मात्र ती जगू शकलेलो नाही.

एक न्यायपूर्ण समाज जिथे अनाचारास शिक्षा मिळते, एक बंधनमुक्त समाज जो प्रेम भावनेने ओतप्रोत आहे, एक कल्पनाशील–रचनात्मक समाज जो मानवतेच्या नव्या मार्गाने जाऊ पाहतो आहे, एक विद्रोही समाज जो चुकीच्या गोष्टीं विरुद्ध आवाज कसा उठवायचे जाणतो, जात–धर्म–संप्रदाय यांनी मुक्त समाज जो आपल्या आत्मिक प्रकाशाने जीवनाला उजळून टाकतो आहे. या साऱ्याचे चित्रण चित्रपटातून होत असल्यामुळे आपल्या आत जगण्याची धग पेटतीच असणारच आहे. तिच्या मार्फत कळत–नकळत स्फूर्तीही मिळणार आहे. हीच चित्रपटाची व्याख्या आहे. ती तुम्ही पडद्यावर वाचू शकता. तसेच मनाच्या कोपऱ्यात सुप्तावस्थेत असणाऱ्या सौंदर्यानुभूतीतही. जी कदाचित काळाच्या ओघात अंधुक झाली असेल, मात्र पुसली गेली नसेल.

भारतीय चित्रपट आपल्या मनातील छोट्याछोट्या स्वप्नांचा कोलाज आहे. त्यात इतकी वैयक्तिक आयुष्यं

सामावलेली आहेत. इतकी वैयक्तिक सुख-दुःख मिसळलेली आहेत त्यामुळे आपला चित्रपट एक कला, एक ब्रह्म न राहता भारतीय समाजाचे आत्मचरित्र झाले आहे. परंपरेशी टक्कर देणारे, तुटणारे व शेवटी तडजोड करणाऱ्या लोकांचे सामूहिक आत्मचरित्र आहे. जगातील कलेच्या दृष्टीने महान चित्रपटाची व्याख्या काही वेगळीच असेल. भारतीय चित्रपटाची या नकाशावर जागा छोटी असेल तरीही जगभरात भारतीय चित्रपटासारखा चित्रपट (मग तो त्याच्या प्रत्येक प्रांतात तयार होणारा प्रादेशिक चित्रपट असला तरी) नसेल जो इतक्या मोठ्या लोकसंख्येच्या कित्तेक पिढ्यांचा श्वास बनला असेल. भारतीय चित्रपट मानवी संबंधांची एक विराट दृश्यावली रचत आला आहे. म्हणूनच आजच्याच काळातच नाही तर, उद्याही शब्द, स्वर आणि चित्राच्या या संयोजनास आपण आपल्यापासून वेगळं ठेऊ शकत नाही. हे नातं गुण-दोषांसह वृद्धिंगतच होत राहिल.

■

**मनोज आचार्य**
२०३/ ए नरसिंह स्मृती, गावठाण,
विरार(पश्चिम), विरार-४०१३०३
भ्रमणध्वनी : ९०९६६८७९६३

वेचक-वेधक

# कृषी संस्कृती

मनोज आचार्य

प्राचीन भारतीय संस्कृती ही मूलतः कृषी संस्कृतीच आहे. म्हणून तर बंकिमचन्द्र चट्टोपाध्याय यांनी लिहिलेले राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्! सुजलाम्, सुफलाम्, मलयज शीतलाम्, शस्यश्यामलाम्, मातरम् ! वंदे मातरम्!' हे अतिशय महत्त्वाचे ठरते. नव्हे, ते गीत एक पवित्र ऋचा म्हणूनच पाहिले जाते. मातृभूमीविषयी मातृत्व भाव प्रज्वलित करणारे तसेच इथल्या काळ्या मातीत उगवणाऱ्या धान्यांची महत्ता प्रगट करणारे ते गीत आहे. त्यामुळे पाहा इथला प्रत्येक सण, वार आणि उत्सव हा धान्यांशी आणि शेतीशी निगडित आहे. उदाहरणार्थ, 'बसंत पंचमी' ही उत्तराखंडातल्या सेंद्रिय शेतीचीच पूजा आहे. पंजाबमधल्या शेतकर्यांची 'बसंत पंचमी' बैशाखीपर्यंत (वैशाखापर्यंत) चालते. महाराष्ट्रातील 'कोजागिरी पौर्णिमा' वा 'नवान्न पौर्णिमा' हा दिवस कृषी संस्कृतीत विशेष महत्त्व असणारा आहे. या दिवसाला वात्स्यायनाने 'कौमुदीजागर' व वामन पुराणाने 'दीपदानजागर' म्हटले आहे. आपल्या पुरातन वेदातदेखील तृणधान्यांचा उल्लेख केलेला आहे. माणूस संस्कृती स्थापन होण्याआधी आदिमानव हा तृणधान्य लागवडीवरच प्रामुख्याने अवलंबून होता. अनेक ठिकाणी पुरातत्त्व विभागाने उत्खनन केले, तेथे तसे पुरावेसुद्धा मिळाले आहेत. त्या काळातील डोंगर उतार किंवा घनदाट अरण्यात राहणारे आदिवासी काही विशिष्ट तृणधान्ये पिकवायचे आणि खायचे. ती पारंपरिक तृणधान्ये आज मागे पडली इतकेच नव्हे, तर ती विस्मृतीत गेली. आजच्या आधुनिक युगात सुधारणा झाल्या, वाहतूक, दळणवळण यांची नवनवी साधने आली, व्यापार, निर्यात वाढली. पण 'कृषी संस्कृती' हे दोन शब्द मात्र परस्परांपासून विभक्त झालेले दिसतात. आम्हांला फक्त 'कृषी' एवढेच माहीत आहे. मात्र तिची संस्कृतीपासून फारकत झाली आहे, हे कोणी लक्षातच घेत नाही. आपण भारतीय बाजरी, वरी, कोडो, नाचणी, राळा, कांग, कुटू, राजगिरा, संनवा अशी अगणित तृणधान्ये पिढ्यानपिढ्या खात आलो आहोत; पण गेल्या काही वर्षांत बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या दिखाव्याला, प्रचाराला भुलून आणि सुपर-फूडच्या व फास्ट-फूडच्या युगात ती आहारात घेणे कमी झाले आहे.

'कृषि-पराशर' हा संस्कृत भाषेत निबद्ध कृषीविषयक प्राचीन चर्चित ग्रंथ आहे. हा ग्रंथ महर्षी पराशरांनी लिहिला. या ग्रंथाच्या आरंभीच त्यांनी नमूद केले आहे की, अन्न-धान्य प्राण आहे, बल आहे आणि तेच समस्त अर्थाचे साधन आहे. देव, असुर आणि मनुष्य हे सारेच अन्न-धान्यामुळेच जीवित राहू शकतात. अन्न-धान्य विना कृषी संस्कृती घडूच शकत नाही हेसुद्धा सांगितले आहे. त्यामुळे मनुष्याचे पहिले कर्म हे कृषी कर्मच आहे. ते त्याने केले तरच कृषी संस्कृतीचे जतन होईल, हे पटवूनही दिले आहे. या ग्रंथात वेगवेगळ्या ऋतूंचे आणि त्यांच्या लक्षणांचे वर्णन केलेले आहे. तसेच अनावृष्टी अर्थात हिमवृष्टीच्या लक्षणांचेदेखील वर्णन वाचायला मिळते. त्या शिवाय कृषी कर्म करताना कोणत्या पशूंचा उपयोग करायचा तसेच त्यांची काळजी कशी घ्यायची, याबाबतही माहिती दिलेली आहे. तसेच कोणती बीजे ही उचित काळात पेरणीसाठी योग्य याचा निर्देश करतानाच, पावसाचे वादळवाऱ्याचे अंदाज वर्तवलेले आहेत. त्याची, मशागत, कापणी आणि साठवणी जल-व्यवस्थापन कसे करायचे, त्या आधीची कर्मे कशी करायची याचीही पद्धत सदर ग्रंथात दिली आहे. शेती आणि त्याला अनुसरून सण-उत्सव यांचे महत्त्वसुद्धा माणसाच्या जीवनशैलीशी कसे निगडीत असते; याचेही विवरण या ग्रंथात वाचायला मिळते.

# चतुरस्र कवयित्री संजीवनी मराठे

**शोभा नाखरे**

कवितेच्या माध्यमातून अतिशय तरल भावूक आणि संजीवक स्वप्नांची निर्मिती करणाऱ्या रसिक वाचकांसाठी विपुल साहित्यसंपदा निर्माण करणाऱ्या कवयित्री संजीवनी मराठे! सातत्याने मनात रुंजी घालणारे, उत्कट रूपाने प्रकटणारे काव्यप्रेम, मनस्वी आणि स्वप्नाळू काव्यात्मवृत्ती! या भाववृत्तीने कवयित्री संजीवनी यांनी काव्यक्षेत्रात अलगदपणे आपला पदन्यास सुरू केला. हा पदन्यास खुलवायला, प्रेमी मनाशी आणि आपल्या अंतर्बाह्य मनाला बिलगून असलेल्या आपल्या जिवलगाशी त्यांनी प्रेमगूज करीत या प्रेमानुभूतीच्या गहिऱ्या छटा कवितेंत अलगद टिपल्या आहेत.

१४ फेब्रुवारी १९१६चा कवयित्री संजीवनी मराठे यांचा जन्म! संजीवनी यांचे वडील गणेशपंत हे लाइफ इन्शुरन्स (LIC) कंपनीत इन्शुरन्स statistician अक्च्युअरी (विमा गणिती) होते. ते भारतातले पहिलेच अक्च्युअरी! त्या काळात इंग्लंडला जाऊन ते प्रशिक्षण घेऊन आले होते. त्यामुळे इंग्रजीवर प्रभुत्व, आणि त्याचा आब काही औरच होता. 'टाय आणि सूट-बूट घालणारे उच्चविद्याविभूषित वडील लाभणे' ही खरं तर त्यांच्या मुलांच्या भाग्याची गोष्ट होती. गमतीचा भाग असा, की हे एकमेव मराठे कुटुंब आहे की ज्यांच्या आडनावात Marathey असा बदल केलेला आहे. हा बदल संजीवनी यांचे वडील गणेशपंत मराठे यांनी इंग्लंडला जाऊन आल्यावर केला. आजही या पहिल्या 'विमागणिती' विद्वानाचे स्मरण एल.आय.सी. कार्यालय ठेवते.

बालपणातल्या नकळत्या टप्प्यावर सुरू झालेला 'प्रीतीचा पायरव'! त्याला सुंदरतेची आणि सुरेलतेची पायवाट कधी येऊन मिळाली, हे कवयित्रीच्याही ध्यानीमनीदेखील आले नाही. या सुरेल अन् सुगंधी पायवाटेवर प्रेमाचा मृद्‌गंध, जिवलगाशी जिवाभावाचे अलगूज करीत राहिला. व्यक्तिमत्त्वाच्या परिपक्वतेबरोबर आत्मशोध, चिंतनशीलता यासम अनेक परिमळ त्यात मिसळले. तरी त्यातून जिवाच्या तन्मयतेने व्यक्त होत गेला तो प्रीतकस्तुरीचाच अस्सल भावस्पर्शी पिवळाधमक केवडा! या केवड्याला वास्तवाचे बोचणारे काटे असले तरी, या केवड्यातले गाभ्याचे कणीस मात्र प्रेमाच्या स्पंदनात चिंब भिजत राहिले, एवढे मात्र खरे!

मनाला जडलेला सुंदरतेचा ध्यास, प्रीतीची आस, नि जीवनलोभाची कास शब्दाशब्दांतून ओसंडून वाहत राहते. अन् त्या ओल्याकंच प्रवाहात आपण वाचक असूनही चिंब भिजून ओलेकच्च होऊन जातो. त्यातल्या उडालेल्या प्रत्येक शब्दतुषाराचे साक्षीदार होतो आपण! स्वप्नात चितारलेले शब्द वास्तवात येतील का? याबद्दल शंकांचे मोहोळ उडाले. साऱ्यांच्या भुवया उंचावल्या गेल्या.

संजीवनी मराठे यांचा विवाह 'रामचंद्र मराठे' यांच्याशी त्या काळातही नोंदणी पद्धतीने १९३७ साली मध्य प्रदेश येथे झाला. दोघांचे वैवाहिक आयुष्य सुरू झाले, ज्यात प्रेम काठोकाठ भरले होते. पाहिलेली सर्व स्वप्ने साकार झाली होती. त्या काळात (१९३७ साली) खरे तर, घरच्यांचा विवाहाला विरोध असतानाही, त्यांच्या मर्जीविरुद्ध केलेला विवाह; हे उचललेले धाडसी पाऊल होते. प्रवाहाविरुद्ध पोहायची धडपड होती. मनाने पुकारलेले प्रस्थापिताविरुद्धचे बंड होते. पण यातही प्रेमाच्या सोज्वळतेचा नि आंतरिक सच्चेपणाचा सूर निनादत राहिला. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर –

'हृदयात रंगलेले लाजेत गुंतलेले  
ओठांवरी उभे ते गाऊन जाऊ कां?  
  हंसतां नभात तारा, हंसतां फुलात वारा  
  प्राणांत हांसते तें उधळून जाऊ कां ?  
तुझी म्हणून घ्यावें स्वप्नींच हे घडावें  
ही आस सानुलीशी पुरवून घेऊ कां ?  
  सत्यांत नाहिं आलें स्वप्नांत येऊ का ?  
  ते रूप राजबिंडे पाहून जाऊ कां?'

*(काव्यसंग्रह- संजीवनी, कविता ३६. स्वप्नांत येऊ का?)*

स्वप्नांत रंगवलेली भावकविता प्रत्यक्ष गाता येईल; असे स्वप्नांतही न वाटलेले चित्र मूर्त रूपात साकार होऊन समोर आले. त्या सोनस्पर्शी क्षणाला नभांत तारा लकाकू लागला, फुलांत वारा हसू लागला. अंतरात्मा उजळून अतीव आनंदाने बहरून आला, हृदयात रंगवलेले, लज्जेने अवगुंठित झालेले, हवेहवेसे वाटणारे देखणे स्वप्न कधी साकार होऊन समोर येईल अशी पुसटशी शंकादेखील नसताना 'छप्पर फाडके' समोर आलेले हे सुख, ही सुखाची परिसीमा मंत्रमुग्ध करणारी! प्रतीक्षेतील आतुरता संपून स्वप्नांच्या विविधरंगी पाकोळ्यांनी बहरलेला जणू मधुमास! ऋतुराज वसंताची चाहूल लागलेले हे मोरपंखी दिवस!

विवाहानंतर रामभाऊ यांनी लुधियाना येथे एका कंपनीत नोकरीला सुरुवात केली. संजीवनी आपली नोकरी सोडून तेथे गेल्या आणि दोघे लुधियाना येथे राहू लागले. अप्रतिम निसर्गसौंदर्य, हिरवाईने नटलेला सभोवार, प्रसन्न वातावरण आणि मनाजोगता साथीदार! 'स्वर्ग धरेवर उतरावा तशी भावावस्था'! 'सुखाने चिंबचिंब भिजण्याचा काळ'! घरात दोघंच जण! संजीवनी, पतीला 'राम' म्हणून संबोधित असत. 'तू माझा अन् तुझी मी झाले.' या ओळीचा प्रत्यय देणारे मनोहारी वास्तव! सुखात न्हाऊन निघालेला काळ अनुभवला त्या दोघांनी! आणि. अशातच गोड सुखाची चाहूल लागली, संसारलतेवर कलिका उमलणार असल्याची गोड बातमी! आनंदात आणखी एका आनंदाची भर पडली. घरच्या विरोधामुळे हा आनंद सर्व कुटुंबीयांसोबत चाखण्याची लज्जत मात्र त्यांना अनुभवता आली नाही.



व्यवसायानिमित्त रामभाऊ यांच्या बेळगाव, खानापूर अशा भ्रमंतीत संजीवनी यांचे लेखन चालूच होते. घरातले सारे व्याप संपले, वेळ मिळाला की त्या लिहीत असत. विशेष म्हणजे त्या वेळी धारवाड आकाशवाणी केंद्रावर त्यांचे कार्यक्रम होत. त्या वेळी घरात टेपरेकॉर्डरदेखील नव्हता. संजीवनी घरी कसून सराव करायच्या, त्यामुळे कार्यक्रम हमखास चांगला व्हायचा. या सर्व तयारीत रामकाका मुलांकडे बघायचे, 'मुलांची काळजी करू नकोस, मी आहे!' या रामकाकांच्या आश्वासक शब्दांमुळे संजीवनी निर्धास्त होऊन तयारी करायच्या. गाण्यासाठी संजीवनी यांना तबल्याची साथ लागायची. रामकाका कामचलाऊ साथीपुरता तबला शिकले होते. दादरा, केरवा सहजरीत्या वाजवायचे. याचा संजीवनी यांना खूप उपयोग झाला. बेळगावात साहित्यिक वातावरण होते. बरेचसे साहित्यिक तिथे राहत. ज्यात सुप्रसिद्ध कवयित्री इंदिरा संत, प्रा. ना. मा. संत, बॅरिस्टर नाथ पै, ग्रामोपाध्ये, म. पां. भावे, सुप्रसिद्ध गायक गजाननराव वाटवे अशी कलाकार मंडळी जवळपास राहत होती. कवयित्री इंदिरा संत यांची नि संजीवनी यांची खूप जवळची मैत्री होती. खूपदा एकमेकांकडे जाणे–येणे होई. शिवाय सोपानदेव चौधरी, बा. भ. बोरकर येऊन–जाऊन असत. बेळगावात वाङ्मय चर्चा मंडळ होते. या मंडळातर्फे नाटके बसवली जायची. विविध स्पर्धा होत. संजीवनींनी 'आंधळ्यांची शाळा' नाटकात कामदेखील केले होते. बेळगावात खूप लोक मराठी भाषिक होते एवढे मात्र खरे! मराठी साहित्याचा उत्सव मनातही कायमच सुरू असे.

पुढे पुण्याला स्थायिक झाल्यावर तेथील वास्तव्यातही अनेक साहित्यिक संजीवनी यांच्या घरी येत असत. ज्यामध्ये शांताबाई किर्लोस्कर, पद्मा गोळे, गो.नी. दांडेकर, सरिता पदकी, वि. द. घाटे, डॉ. अनुराधा पोतदार (म्हणजेच– वि. द. घाटे यांची मुलगी, उषा घाटे) स. शि. भावे अशी अनेक मंडळी असायची. गप्पांची मैफील जमत असे. ज्यात कविता, कथाकथन, हास्यविनोद असे. मात्र कधीच वादावादी, भांडणे झाली नाहीत. उलट नवीन काही लिहिलेले, वाचलेले परस्परांना ऐकवले जायचे. अधूनमधून बा. भ. बोरकर, इंदिरा संत, श्री. पु. भागवतही येत. विस्तारलेल्या साहित्यिक वर्तुळांत संजीवनी पूर्णपणे रममाण झाल्या. कधी संजीवनी स्वतः हार्मोनियम वाजवून कविता गायच्या, रामकाका तबल्याची साथ करायचे आणि मोठा मुलगा प्रताप बासरी वाजवून साथ करत असे. अनोखी मैफील अचानकपणे जमून जाई. जमलेली सारी मित्रमंडळी मनापासून दाद द्यायची नि मैफील रंगत जायची.

पद्मा गोळे, संजीवनी, सरिता पदकी, शान्ता किर्लोस्कर यांनी पुण्यात 'साहित्यप्रेमी भगिनी मंडळाची' स्थापना केली. ही सारी साहित्यप्रेमी मंडळी ठरावीक वेळी एकत्र येत. ज्यात विषय ठरवून चर्चा, कवितावाचन, व्याख्याने, भाषणे होत. 'प्रामुख्याने नवोदित लेखिका, कवयित्री यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा मुख्य हेतू त्यापाठी होता.' विशेष म्हणजे हे मंडळ स्थापन करणारी मंडळी आज हयात नसली तरी मंडळ मात्र पूर्णपणे जोमाने, आणि उत्साहाने कार्यरत आहे. या 'साहित्यप्रेमी भगिनी मंडळातर्फे' शाळाशाळांतून विद्यार्थ्यांच्या कवितावाचन स्पर्धा होतात. अगदी लॉकडाऊनच्या काळातही कविसंमेलनाचे ऑनलाइन आयोजन करण्यात आले होते.

गेली बरीच वर्षे कवयित्री संजीवनी यांच्या स्मृतिदिनी असा कार्यक्रम घेतला जातो. यासाठी 'मराठे कुटुंबाकडून' आर्थिक साहाय्यदेखील केले जाते. यानिमित्ताने मुलांना या कवयित्रीच्या साहित्याचा धांडोळा घ्यावासा वाटतो, वाचन–पाठांतर होते.

कवयित्री संजीवनी मराठे यांनी दीर्घकाळ म्हणजे जवळजवळ चाळीस वर्षे (१९५६–१९९६) बालसाहित्याचे लेखन केले. यामध्ये बालगीतांचे सात संग्रह, तीन बालकथासंग्रह, अनुवाद स्वरूपातील एक कादंबरिका व एक कथासंग्रह यांसारखी रचना हे त्यांच्या बालसाहित्यावरील प्रेमाचेच द्योतक मानता येईल. घर, नातेसंबंध, पशूपक्ष्यांचे व सवंगड्यांचे विश्व, मानवी स्वभाव खेळ, शाळेचे विश्व, सण–उत्सव, स्वप्नसृष्टी असे सारे जीवनस्पर्शी विषय त्यांनी कवितेतून साकारले आहेत. जोडीला देशप्रेम, मातृभूमीप्रेमही त्या विसरत नाहीत. पण हे लेखन करीत असताना कवितेची गेयता, तालबद्धता, नादमयता, नाट्यात्मकता, अभिनयप्रेरकता, विनोद यांचे विचार मनाच्या तळाशी पक्के असतात. बालमनाशी जिव्हाळ्याचा संवाद ठेवत, विविध जाणिवांनी भारलेले जग त्यांनी कवितेत आणले आहे.

बालकवितेमध्ये दोन गुण महत्त्वाचे! एक म्हणजे बालकविता नादमय आणि लयबद्ध असावी. दुसरे असे की, तिचा आशय, विचार चिंतनाला स्पर्श करणारा नसावा! मुलांच्या विश्वाला स्पर्श करणारे विषयच त्यांना भावतात. 'अजब बंगला' या कवितेत संजीवनीबाई खूपच वेगळा विचार मांडतात.

'लहानपणी मी पहिला होता – अजब बंगला
कळत नाही की आता तो आभाळात कसा गेला?
कशा त्याच्या रंगीत भिंती –घडीघडी वितळतात
कसे सूर्यचंद्राचे दिवे –लागतात नि विझतात
काळोखाच्या मळ्यात कशी चांदण्याची फुलं फुलतात
निळ्या पाण्यात कसे, पिसांचे पक्षी पोहत असतात'!!

बालकवितांसाठी दोनदा राज्य सरकारचे पुरस्कार पटकावणाऱ्या संजीवनीबाई! अनोखी कल्पना रंगवणाऱ्या एका कवितेत लिहून जातात–

'मीच ऐकलंय म्हणून सांगते, प्राजक्ताची फुलं गातात
शुभ्रकेशरी सूर लावून, पहाटेची पूजा करतात!
मीच हुंगलंय म्हणून सांगते, तारकांना वास असतो
सूर्यापुढे दरवळण्याचा, चांदण्याला ध्यास असतो'.

पुढे संजीवनी लिहून जातात,

मीच पाहिलंय म्हणून सांगते, शब्दवेली फुलतात–फळतात,
आपली सुंदर छाया घालून, वाचणाऱ्यांना तृप्त करतात.

निसर्गातले हे तीन दाखले देऊन झाल्यावर, शेवटच्या कडव्यात चक्क वास्तवाला हात घालतात. त्या म्हणतात –

'मीच जाणलंय म्हणून सांगते, माणसं दुःख विसरतात.
सुख तेवढं उरि बाळगून देवाजीला दुवा देतात.'

या कवितेत तीन दाखले देऊन शेवटी निष्कर्ष काढलाय असे म्हटले तर? तो अर्थान्तरन्यास अलंकार होतो. ही कविता रचनेच्या दृष्टीनेही वैशिष्ट्यपूर्ण आहे. चारही कडव्यांची पहिली ओळ, मीच ऐकलंय, मीच हुंगलंय, मीच पाहिलंय, मीच जाणलंय म्हणून सांगते अशीच आहे. कडव्यात दुसऱ्या आणि चौथ्या ओळींचे यमक साधले आहे. शिवाय यातल्या काही कल्पना विलक्षण मनोहर आहेत. जसे– प्राजक्ताची फुलं शुभ्रकेसरी सूर लावतात, सूर्यापुढे दरवळायचा चांदण्याला ध्यास असतो. शब्दवेली फुलतात–फळतात. आपल्या सुंदर छायेने वाचकांना तृप्त करतात. माणसे दुःख विसरत सुखाचा ध्यास घेतात. आणि देवाचे ऋण मानतात. आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टीने ही कविता सरस उतरली आहे.

संजीवनी यांच्या बालकविता बालमनावर गारुड करून राहतात, हे तर नक्कीच! बालमनाची स्पंदने कवितांत गुंजत राहतातच, पण वाचकांच्या मनातही मुलांची निरागसता, बालसुलभ भाव थेट हृदयापर्यंत पोहोचतात नि त्यातले सहजभाव नि स्वाभाविकता अंतर्मनाला जाणवते. ती कविता केवळ मुलांसाठी लिहिलेली न राहता मुलांची होऊन जाते. आणि त्या कोमल भावबंधात आपणही नकळत गुंतत जातो. मुलांची अनुमानशीलता, निरीक्षणशक्ती, तर्कशक्ती याबद्दल खात्री पटत जाते. कवितेतील बालमनात रुंजी घालणाऱ्या भावना, कल्पना अभिनव तर आहेतच, तरीही नावीन्याने भारलेल्या आहेत. त्यामुळे मुलांचे कुतूहल, जिज्ञासा यातून निर्माण होणारी शोधक वृत्ती वाचकांना जाणवत राहते. मुलांची प्रश्न विचारायची बालसुलभ भाषा, ठरावीक शब्द वापरायची सवय यामुळे या कविता मुलांना नक्कीच मोहवून टाकतात. मुलांच्या निर्व्याज, निरागस भावना या कवितांतून अगदी सहज डोकावत राहतात. संस्कारक्षम मन घडवणारे नातेसंबंध जोपासणाऱ्या अनेक कविता मनात नात्याची वीण नकळत घट्ट करून जातात. परमेश्वरावरची अढळ निष्ठा, भक्ती अनेक प्रार्थनागीतांतून व्यक्त होत रहाते. अनेक कवितातून विविध गोष्टींचे ज्ञान मिळतेच, सोबत मनोरंजनाचा सेतूही या कविता उभारून जातात. कित्येक कवितांतून जन्मभूमी, मातृभूमी यांच्या प्रेमाचे संस्कार होत जातात. उपमा, रूपक अनुप्रास, अर्थान्तरन्यास असे अलंकार यमक वापरून भाषेची गोडीही त्यांनी वृद्धिंगत केली आहे. त्याचसोबत भाषेच्या या

समयोचित वापरामुळे गेयता, तालबद्धता, त्यातून नादमयता आपोआप जाणवत रहाते.

काव्यसंजीवनी (१९३२), राका (१९३९), संसार (१९४३), छाया (१९४९), चित्रा (१९५७), चंद्रफूल (१९७१), मी दिवाणी (१९८१), आत्मीय (१९९४) अशा काव्यसंग्रहांनी संजीवनी यांनी मराठी कवितेचे दालन समृद्ध केले आहे. अंदाजे ४८५ इतक्या कविता त्यांच्या लेखणीतून साकारल्या. सुसंस्कृत, शालीन आणि सोज्वळतेचे वस्त्र ल्यालेली त्यांची काव्यज्योत मराठी शारदेच्या गाभाऱ्यात दीर्घकाळ शांतपणे तेवत राहिली आहे.

रविकिरण मंडळाचे पडसाद संजीवनी यांच्या कवितेत उमटत राहिले तरी आपली कविता काव्यगायन करून अधिकाधिक रसिकांपर्यंत पोहोचवण्याचा हुकमी मार्ग त्यांच्याकडे होता. संजीवनी प्रथम बुजऱ्या पावलांनी आणि नंतर आत्मविश्वासाने या प्रवाहात सहजपणे सहभागी झाल्या. त्यांच्या कवितेतील स्त्री केवळ प्रेयसी म्हणून वाचकांसमोर येत नाही, तर नात्याचे अनेकविध पदर उलगडून समोर प्रकटते. त्यातही विशेषत्वाने भारतीय परंपरेचा अभिमान वाटावा असा आदर्शत्वाचा वारसा सांगणारी कविता त्यांच्या 'चित्रा' संग्रहात वाचायला मिळते. एका परिपूर्ण स्त्रीत्वाचे दर्शन घडविणारी ही कविता-

मी कांता, मी माता, शिक्षक मी, सेवक मी,
कलावती, शास्त्रज्ञा, विविधगुणी नटते मी,

स्त्रीची बहुतेजोगुणी अशी प्रतिमा समोर साकारली जावी, अशी काव्यचित्रे संजीवनी रेखाटतात. 'माझ्या प्रतिभे सान बालिके होई विश्वरूपिणी' असे कवितेला विनवणाऱ्या; संजीवनी यांच्या मनातील प्रेमभावनेला केवळ बाह्यस्तराचे पदर नसून त्याग, कर्तव्य, भक्ती, सकारात्मकता यासह धुंद मीलन, प्रतीक्षा, विरह, समर्पण यांचे अलवार हितगूज कवितांत जाणवल्यावाचून राहत नाही.

कवितेतून व्यक्त झालेल्या परमेश्वराविषयीच्या आपल्या भावनांबद्दल संजीवनी म्हणतात- मी टागोरांच्या कविताही खूप वाचल्या. त्यांच्या कवितेतून व्यक्त झालेल्या ईश्वरविषयक विचारांनी भारले गेले आणि मग मला वाटू लागले, की देव मूर्तीत आहे, असं कशासाठी मानायचं? हरेक चैतन्यात परमेश्वराचं रूप आपण पाहू शकू. जगामध्ये जे जे सात्त्विक आहे, सुंदर आहे, ते परमेश्वराचं दर्शन आहे, असं मला वाटतं. (माधवी गंगापूरकर, 'कविताश्री' मुलाखत साहित्यप्रसार, नोव्हे. डिसें. १९९१ पृ.३६.)

'परिमला' आणि 'भावपुष्प' असे त्यांचे दोन गीतसंग्रह! ज्यातील काही सुप्रसिद्ध गीते अशी, 'सत्यात नाही आले, स्वप्नात येऊ कां?', 'शांत सागरी कशास उठविलीस वादळे?', 'अंबरात नाजुकशी चंद्रकोर हासे!', 'या गडे हासू या', 'सकल मिळूनी हसुनी खुलूनि', 'हसतील मजला कबीर मीरा...' असेच ओठावर रुळलेले हे शब्द!

'सोनियाचा पाळणा, रेशमाचा दोर गं!
मधोमध विसावला माझा चित्तचोर गं!'
(१८.सोनियाचा पाळणा/संग्रह-परिमला)

नादमयता, चित्रमयता ही वैशिष्ट्ये असलेल्या बाईंच्या रचना! परत-परत वाचाव्या, मुळातूनच वाचाव्या अशा!

वैविध्यपूर्ण लेखन करणाऱ्या संजीवनी यांच्या नावावर दोन बालकथासंग्रह आहेत.

१. माणिकमोती (१९९३)

२. इच्छामणी व इतर गोष्टी ! (१९९३)

बालकथालेखनातून आशयसंपन्नता, संस्कारशीलता, अद्भुतरम्यता, कल्पनाचातुर्य तसेच देशप्रेमाचा स्फुल्लिंग सहजगत्या व्यक्त होताना दिसतो. वाचक संजीवनी मराठे यांच्या बाललेखनाच्या प्रेमात पडून संस्कारांनी चिंब भिजतो एवढे मात्र खरे! अनुवादित साहित्यातही संजीवनी यांचे योगदान मोठे आहे.

१. 'क्रिस्ती कम्स होम' या बालकादंबरीचा 'लाडकी लेक' हा स्वैर अनुवाद. (१९७६)

'क्रिस्ती कम्स होम' या बालकादंबरीचा स्वैर अनुवाद संजीवनी मराठे यांनी 'लाडकी लेक' या शीर्षकाने केला आहे. कुमार वयोगटातील मुलांसाठी असलेल्या 'कुमार कादंबरीमाला' या योजनेअंतर्गत हा स्वैर अनुवाद साकारला आहे. स्वीडन आणि फिनलंड या दोन देशांतील प्रदेशात ही कादंबरी वाचकांना घेऊन जाते. कादंबरीतील प्रवाहीपण, सहजता, ओघवती शैली यामुळे एखादा चित्रपट पाहावा तसे याचे कथानक डोळ्यासमोरून तरळत जाते, नि वाचक त्यात गुंगून जातो. कादंबरीत फिनलंडमधील एका कुटुंबाची कहाणी चितारली आहे. युद्धामुळे सामान्य माणसाचे जीवन कसे हलाखीचे आणि विस्थापित होते, नि पूर्ण आयुष्य कसे बदलून जाते; याचे दर्शन या कादंबरीच्या कथानकातून वाचकांना होते. मासूमा कथासंग्रहतील कथादेखील रंजक आणि उत्कंठावर्धक आहेत.

२. अर्वींशर्पीीशी`ष चेस रपव जींहशी उहळश्रवीशपी डींळशी या श्री. अमितकुमार भौमिक यांच्या मूळ बालकथासंग्रहाचा अनुवाद- 'मासूमा आणि इतर प्राणिकथा' हा बालकथासंग्रह (१९९६)

३. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या 'गीतांजली' या काव्यसंग्रहातील निवडक रचनांचा 'गीतांजली दर्शन' या नावाने केलेला स्वैर अनुवाद. (१९९८)

संजीवनी मराठे यांनी रवींद्रनाथ टागोर यांच्या 'गीतांजली' या नोबेल पारितोषिक प्राप्त असामान्य दर्जाच्या कलाकृतीचा निवडक भाग 'गीतांजलीदर्शन' नावाने मराठीत रसिकांना उपलब्ध करून दिला आहे. हे काम शिवधनुष्य पेलण्यासारखे, अवघड होते. केवळ दोन-चार कविता आपल्या भाषेत आणायच्या नव्हत्या, तर तब्बल चव्वेचाळीस कवितांचे हे काम होते. मुक्त किंवा स्वैर भाषांतर करताना, ते करणाऱ्याला ती कलाकृती मुळात ज्या भाषेत आहे, त्या भाषेवर आणि ज्या भाषेत भाषांतरित करायचे आहे त्या भाषेवर प्रभुत्व असावे लागते. दोन्ही भाषांचे चांगले ज्ञान असावे लागते. त्याशिवाय असे भाषांतर यशस्वी होऊ शकत नाही.

अनेक वर्षे तालबद्ध, लयबद्ध, गेय कविता लिहिणाऱ्या संजीवनी मराठे यांनी पुढे मुक्तछंदातही काव्यलेखन केले. सातत्याने प्रयोगशील राहून नवनवीन प्रवाहांना आपल्या लेखनात आणणाऱ्या संजीवनी मराठे यांनी 'चौफुला' नावाने चारोळ्यादेखील लिहिल्या आहेत. 'आत्मीय' संग्रहाच्या अखेरीसही असे काही (२६) चौफुले समाविष्ट करण्यात आले आहेत. वेगळे २४ चौफुले आहेत. निसर्ग, प्रेम, मैत्री आणि काही नकळतपणे मांडलेले तत्त्व वा नियम यावर आधारित हे चौफुले आहेत. नमुन्यादाखल हे उदाहरण पाहू-

'सावल्या झिळमिळतांना पाहून
वारा फुरंगटून स्तब्ध राहिला,
सावल्या हळुवार होऊन म्हणाल्या-
'तुला झोप आलीय कां रे बाळा?'

'ट्युलिप्स'च्या देशातून!-(पत्रसंग्रह) अंजू व्हॉन वेर्श संपादक- संजीवनी मराठे!

संजीवनी मराठे यांचे सर्वात लहान अपत्य, शेंडेफळ म्हणजेच अंजू! अतिशय लाडकी आणि लाघवी लेक! तिच्या पत्रव्यवहारावर संपादन केलेले पुस्तक म्हणजे 'ट्युलिप्स'च्या देशातून! अंजू तिच्या घरी-सासरी हॉलंडला गेली. तिथून तिने पाठवलेली पत्रे! पुस्तकाच्या रूपात वाचकांच्या भेटीसाठी संपादनरूपात उपलब्ध आहेत, ती म्हणजेच ऽट्युलिप्सच्या देशातून'! मायदेश आणि सासरदेश यांच्यातला साधलेला तोल, दोन्ही देशांशी असलेले भावबंध, त्याला जोडणारी प्रेमाची, मायेची आणि आत्मीयतेची कवाडे मनाच्या गाभाऱ्यात सदैव मोकळी राहतात. म्हणूनच पुस्तकाचा शेवट करताना ३१ डिसेंबर १९९२ ला दोन ओळींचेच पत्र लिहिले आहे. अंजूताई लिहितात- आज वर्षाचा शेवटचा दिवस! रात्री खूप सेलिब्रेशन होईल. १२ वाजता शॅम्पेन पाण्यासारखी वाहील. पण भारतातल्या झोपडपट्ट्यांमधून पाणी तरी वाहील का? एकंदरीत पुस्तक वाचून आनंद घ्यावा, नि हॉलंडची पत्ररूपी सैर करावी. आवर्जून वाचावे असेच हे पत्रपुस्तक!

संजीवनी यांच्या या साहित्यशलाका रसिकांच्या मनात चिरस्वरूप आनंद आणि तेजाची बरसात करीत राहोत, यासाठीच हा अट्टहास!

■

**शोभा नाखरे**
भ्रमणध्वनी : ९८६९७८७३९८

वेचक-वेधक

## पोळ, गल्ली, पेठ


मनोज आचार्य

भारतातील प्रत्येक प्रांतातील पारंपरिक घरांच्या वैशिष्ट्यपूर्ण रचना आजही तिथल्या खेड्यांमध्ये, गावांमध्ये किंवा शहरांच्या भरवस्तीत किंवा उपनगरांच्या निर्जन, अस्पृश्य वस्तीत गतकाळाच्या स्मृती जागवीत उभ्या असलेल्या दिसतात. त्या आज पाहताना असे लक्षात येते की, त्यावेळच्या वास्तुविशारदांनी, अभियंत्यांनी व्यक्ती, समाज व परिसर हा सुखदायक, सुरक्षित व उन्नतीपोषक राहील याबाबत विचार केला होता. शिवाय हवामान, भौगोलिक परिस्थिती, नैसर्गिक साधनांची उपलब्धता तसेच धार्मिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय इत्यादी बाबींचा आणित्यायोगे नियंत्रित झालेल्या मानवी जीवनाच्या परिणामांचाही विचार खूप बारकाईने केला होता. उदाहरणार्थ, भौगोलिक परिस्थितीनुसार घरे बांधली असतील, तर त्यांच्या भिंती, खिडक्या, दरवाजे, घराला खोल्या कशा व किती असाव्यात, दारे कोणत्या दिशांना असावीत, याचाही विचार घराची आतील भागाची रचना करताना केलेला पाहायला मिळतो. त्या खेरीज धार्मिक वा सामाजिक कल्पनांचा प्रभाव लक्षात घेऊन कित्येकदा भिन्न भिन्न धर्मांच्या, वंशांच्या, वर्णांच्या वा पंथांच्या व्यक्तींची घरे नगर वस्तीच्या निरनिराळ्या भागांतच रचनाभिन्नत्वाचा विचार करून बांधलेली दिसतात. अर्थात त्यात उजेड, हवा ही वास्तुशास्त्रीय दृष्टी होतीच शिवाय त्यामागे काही धार्मिक संकेतही होते. शिवाय ती घरे ज्या भागात होती, त्या त्या भागांना अमुक-तमुक पोळ, गल्ली, पेठ असे नामकरणही केलेले दिसून येते. काही ठिकाणी नगररचनेचे निर्बंध लक्षात घेऊन त्यानुसार घरासाठी योजलेल्या जागेचे क्षेत्रफळ आणि घरबांधणीसाठी वापरावयाचे क्षेत्रफळ यांचेही प्रमाण ठरलेले दिसून येते. आजची नवीन घरे पाहाताना या सर्व गोष्टींचा विचार फारसा केलेला दिसत नाही.

# अनुभवातून मिळालेलं शहाणपण....

जयंत देशपांडे

असं म्हणतात की, मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही आणि आजारी पडल्याशिवाय जगण्याचे महत्त्व कळत नाही. नखांला साधी जिव्हाळी लागली, तरी आपले सर्व लक्ष्य तिकडेच राहते. शरीराला झालेले कुठलेही दुःख, यातना आपल्याला शरीराच्या विभिन्न अवयवाचे महत्त्व सांगून जातात. आपले शरीर ही अत्यंत लाजवाब गोष्ट आहे. प्रत्येकाला मिळालेली अद्‌भुत आणि अलौकिक देणगी आहे. शरीरातील छोटासा बदल प्रत्येकाला भविष्यात येणाऱ्या चांगल्या वाईटाची आगाऊ सूचना देत असतो. बरेचवेळा असे बदल आपल्या लक्षांत येत नाही किंवा आले तरी आपण त्यांच्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष्य करतो. बऱ्याच वेळी आपण घरगुती उपचार किंवा आजीच्या बटव्यावर अवलंबून राहतो. बहुतेक मंडळी अगदी नाईलाजाने डॉक्टरकडे जातात. बरेच जण आपल्या ज्ञान-अज्ञानानुसार आणि ओळखीच्या फार्मसिस्टच्या सल्ल्याने औषध घेतात. असे करण्यात त्यांचा उद्देश डॉक्टरची तपासणी फी वाचवावी असा नसतो. पण कां कोण जाणे, डॉक्टरकडे जाण्याचे टाळल्या जाते हे नक्की. कदाचित डिस्पेन्सरी किंवा हॉस्पिटलच्या गंभीर वातावरणामुळे असावे. मनाचा हिय्या करून किंवा शरीराला होणाऱ्या त्रासामुळे आपण नाईलाजाने डॉक्टरकडे जातो. खरंतर डॉक्टरने तपासण्या आधीच बऱ्याच गोष्टी स्वतःच्या स्वतःला कळत असतात. डॉक्टरसुद्धा काय होतंय, हे आपल्याला सुरवातीलाच विचारतात. प्राथमिक तपासणीनंतर पुढे काय उपचार करायचे, हे आवश्यकतेनुसार रक्त, Xray, स्कॅनिंग इत्यादी तपासणीद्वारे ठरविले जाते. एकदा निदान झाले की, डॉक्टर गरजेनुसार पथ्य पाणी, औषध, गोळ्या लिहून देतात. पूर्ण कोर्स झाल्यावर पेशंट बरा होतो.





बहुतेक वेळा आपणच क्षमतेपेक्षा शरीराच्या विभिन्न अवयवांवर जास्त ताण देत असतो. मग त्या खाण्यापिण्याच्या सवयी असोत, व्यसने असोत, नियमित व्यायामाचा अभाव, शरीरशास्त्राविषयीचे अज्ञान किंवा आपल्याला काहीतरी भयंकर झाले असावे ही अनामिक भीती.... व्यक्तिपरत्वे ही कारणे कमी अधिक होऊ शकतात. शक्यतो प्रत्येकाचे शरीर वरील अनियमितता झेलत असते. गोष्टी जेव्हा शरीराच्या सहनशक्तीच्या पार होतात, तेव्हा आपल्याला शरीराच्या कुठल्या तरी अवयवामार्फत बऱ्याच गोष्टी कळतात. मग आपण डॉक्टरकडे जातो. Stitch in time saves nine ही एक लोकप्रिय उक्ती जरी असली, तरी आपण त्यानुसार वागत नाही. मला काहीच होणार नाही, हा विश्वास इतका दांडगा असतो की, आपण प्रतिबंधात्मक गोष्टी करायला धजत नाही. बऱ्याचदा थोडाबहुत त्रास झाल्यावर तो दोनतीन दिवसात आपोआपच दुरुस्त होतो आणि आपणच आपल्या शरीराबद्दल फाजील आत्मविश्वास बाळगायला परत सुरुवात करतो. खरेतर निसर्गाने शरीरातील प्रत्येक अवयवांला आपोआप दुरुस्त होण्यासाठी विशेष शक्ती किंवा किमया प्रदान केली आहे. काही आजारामुळे अवयवांच्या पेशी निकामी वा मृत झाल्या असतील, तर त्या विशिष्ट काळानंतर पुनर्जीवित होण्याची प्रक्रियादेखील सोबतच सुरू असते. अर्थात सर्व अवयवांच्या बाबतीत हे शक्य नसते. किडनीचे सेल जर निकामी झाले, तर ते पुनर्जीवित होत नाहीत. मात्र निसर्गाने असे सेल किडनीमध्ये भरपूर प्रमाणात दिलेले असतात. काही सेल जरी मृत पावले, तरीही किडनीचे कामकाज व्यवस्थित सुरू राहते. पण... जेव्हा शरीरावर आक्रमण करण्याच्या विषाणू, जंतू किंवा संसर्गाची ताकत शरीराच्या रोगप्रतिबंधक शक्तीपेक्षा अधिक होते तेव्हा शरीरात काहीतरी अवांछित

बदल घडत राहतात. त्यामुळे ताप, डोकेदुखी, पोटदुखी, अपचन इत्यादी प्रकार होत राहतात. त्रास सहन न झाल्याने आपल्याला डॉक्टरकडे जाणे अनिवार्य होते. शरीराला होणाऱ्या त्रासाला सहन करत राहणे व त्याकडे सतत दुर्लक्ष्य केल्याने छोटेमोठे आजार भविष्यात गंभीर रूप धारण करू शकतात. शिवाय परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकते. शरीराच्या प्रत्येक अवयवाला स्वतःची अशी जबरदस्त शक्ती निसर्गाने दिलेली आहे. स्वस्थ व्यक्तीचे हृदयाचे ठोके हे मिनिटाला ७२ असावेत. ते काही कारणास्तव १६० पर्यंत जरी गेले, तरी मनुष्य जिवंत राहू शकतो आणि उपचाराने ते नॉर्मल होऊ शकतात. मनुष्याचा उच्च रक्तदाब २०० पर्यंत गेला, तर त्याला त्रास होतो. तरीही तो जिवंत असतो. प्रत्येक व्यक्तिपरत्वे अवयवांची सहनशक्ती वेगवेगळी राहू शकते. शरीराच्या अवयवामधील ही अनियमितता कुठल्या न कुठल्या लक्षणाद्वारे दिसून येते. शरीरात काहीतरी बिघाड झाला आहे, हे आपले आपल्यालाच कळून येते. समजून उमजून जर आपण अशा लक्षणांकडे दुर्लक्ष्य केले, तर मात्र परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकते.

सेल्फ मेडीकेशन ही अत्यंत वाईट आणि घातक सवय आहे. बहुतेक प्रसंगी जाहिरातींमुळे आणि जवळच्या लोकांनी त्यांच्या अनुभवानुसार सांगितलेली औषधे डॉक्टरच्या सल्ल्याशिवाय घेतली जातात. काही वेळा त्याचा उपयोगसुद्धा होतो आणि आपला आत्मविश्वास दुणावतो. मग आपण अशी चूक वारंवार करू लागतो. Self Medication चे परिणाम दुरोगामी असू शकतात. दाताचे दुखणे सहन करणे फारच कठीण असते. ते प्रत्येकाला आयुष्यात कधी न कधी भोगावेच लागते. त्यावर पेनकिलर घे. असा सल्ला देणारे मित्र मंडळी, जवळपासचे लोक खूप असतात. पेनकिलरने काही तासापुरता आराम मिळतो जो कायमस्वरूपी नसतो. वारंवार पेनकिलर घेतल्याने पोटाचा खेळखंडोबा तर होतोच, शिवाय किडनीवरसुद्धा त्याचा दुष्परिणाम होऊ शकतो. ॲसिडीटी हा पण अत्यंत फसवा आजार ठरू शकतो. आम्लपित्त घरगुती औषधाने कमी होते. काही व्यक्तींकरिता मात्र ती हृदय विकाराची नांदीपण ठरू शकते. माझ्या एका जवळच्या व्यक्तीबद्दल हे घडलेले आहे. ताप येणे म्हणजे शरीरात काहीतरी इन्फेक्शन दडलेले आहे हे नक्की. Paracetamol घेऊन ताप कमी होतो, पण ते इन्फेक्शनवर काम करीत नाही. याकरिता डॉक्टरकडून तपासणी करून योग्य तो इलाज करणे आवश्यक असते. ज्याचे काम त्यानेच करणे इष्ट.

आपल्याला आश्चर्य वाटेल, हे मी सगळे तुम्हाला का सांगतो आहे, याची प्रमुख दोन कारणे आहेत....

०१. दिनांक २२.०८.२०२१ रोजी मला भरपूर ताप आल्यामुळे हॉस्पिटलमध्ये ॲडमिट व्हावे लागले. वयाच्या ६८व्या वर्षापर्यंत मी स्वतःसाठी कधीच हॉस्पिटलचे तोंड पाहिले नव्हते. माझा तो अभिमान क्षणात गळून पडला. वर नमूद केलेल्या गोष्टी सर्वसामान्य व्यक्ती प्रमाणे मीसुद्धा केलेल्या होत्या. त्या अनियमिततेचे फळ असावे. वेळीच आणि चांगले उपचार मिळाल्याने परिस्थिती लवकर आटोक्यात आली. बऱ्याच गोष्टींना ब्रेक लागला, पथ्यपाणी मागे लागले. आता बरंच काही ठीक आहे.

०२. माझे स्नेही श्री. मकरंद उमाळकर, वर्धा हे माझ्या प्रकृतीची चौकशी करत असतात. त्यांनी मला आग्रह केला की, तुमचे तब्येतीबद्दलचे अनुभव वाचकांसाठी लिहा. खरेतर आपले दुःख, यातना स्वतःच सहन करणे इष्ट, त्याचे प्रदर्शन करणे अनुचितच. वाचकांना माझे अनुभव उपयोगी पडावे व आजूबाजूला काय घडते आहे, याची जाणीव व्हावी; या दृष्टीने लिहिले आहे. स्वतःच्या दुःखाचे कौतुक केले की, कोणालाच आवडत नाही हेही तितकेच खरे. वरील लेखातील गोष्टी आपल्याला उपयोगी पडल्या, तर लिखाणाचा उपयोग. वाचा आणि विचार करा, पटले नाही तर सोडून द्या. ■

वेचक-वेधक

# सल्तनत-ए-भोपाल

मनोज आचार्य

इसवी सन १८१९ ते १९२६ अर्थात १०७ वर्षांच्या काळात पुरुषांचा तीव्र विरोध असतानाही नवाब कुदसिया बेगम, नवाब सिकंदर बेगम, नवाब शाहजहाँ बेगम आणि नवाब सुल्तान जहाँ बेगम या चार शिक्षित आणि बुद्धिवान बेगमांनी मुस्लीम परंपरा, रूढी झुगारून, नकाब दूर सारून भोपाळ संस्थानचा उत्तराधिकार प्राप्त केला. या चौघींनी तीन पिढ्या पुरुष वारसांना राज्य करायला दिलेच नाही. शिवाय जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन एक आदर्श शासनकाळ स्थापित केला. तसेच भोपाळ संस्थानचा चिकाटीने विकास करताना वास्तुकला, स्त्री-शिक्षण, न्याय-व्यवस्था, नवीन खाद्य-संस्कृती, गृह उद्योग, आरोग्य-व्यवस्था वाढीस लावल्या. थोडक्यात, एके काळच्या मुस्लीम पुरुषसत्ताक राज्यात आपला झेंडा रोवणाऱ्या शिवाय त्याकाळात मुस्लीम स्त्रियांना सार्वजनिक जीवनात इतके फारस महत्त्व नसताना, या सुशिक्षित, धोरणी आणि कर्तृत्ववान चौघींच्या नेतृत्वाचा इतिहास आजच्या काळात जाणून घेणे म्हणूनच महत्त्वाचे वाटते.

# नर्मदा मैय्याचे श्रद्धास्थान-२

सुषमा घाटे

आमची परिक्रमा दुसऱ्या दिवसापासून सुरू होणार आहे. आजच दुपारी ओंकारेश्वरला पोहोचलो. संकल्पा आधी नर्मदेच्या जन्मदात्याचे दर्शन घ्यायचे होते.

ओंकारेश्वराचे दर्शन घेतले. बरोबर शक्तींचे दर्शन घेतले. नंतर मंडपात उभ्यानेच नर्मदा मैय्येची आरती केली व शिवशंकराची आरती केली. नर्मदा अष्टक म्हटले.

परिक्रमेला निघण्याआधीच नर्मदाष्टकाची गोडी लागली होती. शंकराचार्य रचित अष्टक म्हणजे, जगद्‌गुरु





शंकराचार्यांना साष्टांग दंडवत! यांची महती गाण्याएवढी अथवा लिहिण्याची माझी पात्रता नाही, तरीही जमेल तसे लिहिते आहे.

ओंकारेश्वराच्या मागील बाजूस काही पायऱ्या उतरून गेल्यावर शंकराचार्यांची गुंफा आहे. ही गुंफा फारच सुंदर बांधलेली आहे. दगडावर दगड रचून सुंदर कमानी केल्यात, काही पायऱ्या उतरून गेल्यावर आतमध्ये ओलसरपणा आहे. नर्मदेची उभी दगडातील देखणी मूर्ती आहे. मूर्तीच्या पायापाशी थोडे थोडे पाणी वरती येताना दिसते. त्या शिवाय शंकराचार्यांचे गुरू श्रीमद्‌सोमपादाचार्य यांची मूर्ती आहे व जगद्‌गुरुची प्रतिमाही आहे.

बाजूला मैय्येचा विस्तीर्ण चपळ प्रवाह, म्हणजे युवा अवस्थेतील अवखळ बालिके ने मोहात पाडवे अगदी तसा.तिथून हलावेसे वाटत नाही.

गुंफेत नर्मदा कशी, असा प्रश्न मनांत आला!

शंकराचार्य पाच वर्षांचे असताना त्यांचे मौजीबंधन झाले आणि त्यांचे संन्यास जीवन सुरू झाले. पित्याचे छत्र लहानपणीच हरपले होते. नंबुद्रिपाद ब्राह्मणाचे शिवाच्या कृपेने झालेले शंकराचार्य हे ज्ञानवंत, बुद्धिमान, सरस्वतीचा वारसाहक्क असलेले होते. तसेच शब्दांचा नाद-ताल निर्मिती करणारे होते. बालक शंकराचार्य गुरुगृही अध्ययनाला गेले. जी विद्या शिकायला २० वर्षे लागतात ती विद्या त्यांनी केवळ २ वर्षांत आत्मसात केली. गुरुजी अचंबित झाले. अगस्ती ऋषिंनी शंकराचार्यांचे आयुष्य फक्त ३२ वर्षे सांगितले होते. त्यावेळी शंकराचार्यांच्या मातेची अवस्था फारच वाईट होती. परंतु जगाच्या कल्याणासाठी जगाला ज्ञान देण्यासाठी जन्माला आलेले शंकराचार्य कोणत्याही मोहात मायापाशात अडकणारे नव्हते. ८व्या वर्षी गुरुच्या शोधात निघाले. तेही नदी पर्वत जंगले तुडवत निघाले. प्रथम तुंगभद्रा-शृंगेरी-गोकर्ण मग ओंकारेश्वरला पोहोचले.

अखेरीस मैयेच्या काठावर लहानशा गुंफेत गुरुगोविंदपाद ध्यानस्थ बसलेले होते. त्या ठिकाणी बालक शंकराचार्य पोहोचले. गुरूंना नमस्कार केला, ''तू कोण आहेस?'' गुरूंनी प्रश्न विचारला.

बालक शंकराचार्य म्हणाले, ''मी पृथ्वी-जल-तेज-वायु- आकाश नाही. त्यांचे गुणही माझ्यात नाहीत. याहून

जे परे आहे परातत्व आहे ते आहे.'' अद्वैताचा साक्षात्कार झाला.!!!

त्यावेळी गुरूंनी शंकराचार्यांना सांगितले मला कोणी भेटायला आल्यास बाहेरच थांबवून ठेव. माझे ध्यान संपेपर्यंत बाहेर राखण कर.

गुरूंची आज्ञा शिरसावंद्य.

त्यावेळेस शिवकन्या - रेवा, अविनाशी बापाची अविनाशी मुलगी भेटायला आली.

नर्मदेसारख्या सुस्वरूप,अवखळ युवतीस रोखून ठेवणे महाकठीण काम होते. स्त्रीहट्ट थांबवणे अशक्यच! त्या लहानशा सुंदर गुंफेत जगत् शंकराचार्यांनी नर्मदेला प्रवाहबंधित करून रोखून ठेवले. म्हणून नर्मदा मैय्या गुंफेत आपल्या लहान धारेसहीत आजही उभी आहे.

शंकराचार्यांच्या गुरूंच्या आश्चर्यास पारावार राहिला नाही.

आपल्या सामर्थ्याने जगत्‌गुरू शंकराचार्यांनी महान नर्मदेला, कंकरांचा रवा बनवणाऱ्या रेवेस, नर्मदेस शांत स्वरू प दिले.

ही गुंफा आकर्षक आहेच. गुढत्वाची प्रचिती येते. कमालीचे सामर्थ्य या गुंफेत आहे.

परतत्त्वाचे मूल्यमापन करणे केवळ अशक्य आहे. शंकराचार्यांची स्तोत्र अष्टकं, सौंदर्य लहरी हे कळण्यासाठी पुन: पुन्हा जन्म घ्यावा लागेल.

भरतवर्षाच्या चारी दिशेस मठ स्थापन केले. त्यासाठी पदयात्रा केली सारा देश पादाक्रांत केला.



भारत देश ज्ञानाने समृद्ध केला. फक्त जगत्‌गुरू म्हणल्याने समाधान होतच नाही. मला त्यांच्या अष्टकांचा अर्थ समजला तरी खूप आनंद होईल.

ओंकारेश्वर सुखदेव मुनी गेली ६ वर्षे उन्मनी अवस्थेत आहेत त्यांचेही दर्शन झाले.

नर्मदा मैय्याने सगळे साधक - उपासक - योगी - संत - महंत - भगवंत - साधुंना आपल्या जवळ युगानयुगे ठेवले आहे.

।। नर्मदे हर ।।

■

---

वेचक-वेधक

## भाषा आणि साहित्य

मनोज आचार्य

भाषेचे क्षेत्र हे साहित्याहून विस्तृत व व्यापक आहे. त्या व्यापक पटावर साहित्य हा भाषेचा एक विशेष वापर ठरतो. साहित्य म्हणजे भाषा नाही. साहित्य आणि भाषा या दोन निरनिराळ्या गोष्टी आहेत. त्या दृष्टीने पाहता आपण भाषेबाबत फार सजग आणि गंभीर आहोत असे मला अजिबात वाटत नाही. हे मी अगदी ठामपणे सांगू शकतो. राज्यभरातील अनेक विद्यापीठांत मराठी भाषा विभाग म्हणून जरूर असतो. त्यात भाषेविषयी संशोधन करणारे विरळाच असतात. भाषा अध्ययन म्हणजे साहित्याचा अभ्यास नव्हे, त्यासाठी वेगळ्या स्वरूपाचे प्रयत्न असावे लागतात. भाषेचा संसार हा साहित्याच्या संसारापेक्षा अधिक व्यापक आहे. पण हे भान आपण बाळगतो, असे मला वाटत नाही. भाषेची आब वा बूज आपण राखत नाही. २७ फेब्रुवारी हा दिवस आला की, मराठी भाषा गौरव दिनाचा सर्वत्र सुळसुळाट सुरू होतो. थोडक्यात, आमच्या मातृभाषेचा गौरव फक्त त्याच दिवशी करायचा आणि इतर ३६४ दिवस जिभेला हाड नाही, जीभ सैल सोडणे, उचलली जीभ आणि लावली टाळ्याला, जिभेला लगाम नाही अशा वाक्प्रचारांचा सर्रास आपल्या आचरणातून आपल्या बोलण्यातून वापर करायचा. मग मराठी भाषेचा गौरव कुठे जातो, माहीत नाही. तेव्हा केवळ खोटी मराठी अस्मिता, मराठी माणूस आपल्या भाषेच्या बाबतीत कसा जागरूक आहे, हे दाखवून द्यायचे असते.

हल्ली आपण प्रसारमाध्यमांसमोर काय बोलतो आहोत, कोणते शब्द वापरतो आहोत, त्याचे दूरगामी परिणाम काय होतील, याचे भान हल्लीच्या राजकीय नेत्यांना आणि समाज कार्यकर्त्यांना अजिबात उरलेले नाही. त्यामुळे त्यांच्यासाठी निर्लज्ज हा मराठी भाषेतील शब्दसुद्धा तोकडा पडतो. आता यासाठी नवीन शब्द शोधायला हवा. त्यांच्या समर्थकांची तर कीव येते. कारण त्यांनी तर मेंदू गहाण ठेवल्यागतच ते वागताना बघायला मिळतात.

# जोडी

**सौ. श्यामला पळणीटकर**

शाळेत असताना इतिहासाच्या व विज्ञानाच्या प्रश्न पत्रिकेत 'जोड्या जुळवा' असा एक प्रश्न असे. मार्क सहज मिळवण्यासाठी त्या प्रश्नाचा आधार वाटायचा. तसाच आधार आपल्याला आपल्या आयुष्याच्या जोडीदारामुळेही प्राप्त होत असतो. आपल्या घरातसुद्धा अनेक वस्तूंच्या जोड्या वर्षानुवर्षे आधीच जमलेल्या असतात. किंबहुना प्रत्येक जोडीतील एका वस्तूंचे अस्तित्वच दुसऱ्या वस्तूंवर अवलंबून असते.एकण काय जोडी हे सूत्र आपल्या जीवनात अथपासून इतिपर्यंत जोडले गेलेले आहे.

आत हेच पाहाना - खल-बत्ता, तवा-परात, उखळ-मुसळ, पाटा-वरवंटा, सतेलं-पातेलं, पळी-पंचपात्री, दौत-टाक, धूप-दीप, सहाण-खोड, सडा-सारवण, गडवा-भांडे, कापूर-उदबत्ती अशी ही यादी कितीतरी वाढेल. दैनंदिन जीवनात आपण या वस्तूंचा वापर जोडीनेच करतो. आता मिक्सर हाताशी असल्यामुळे खलबत्ता, पाटा-वरंवटा या जोड्या कालबाह्य झाल्या आहेत. तरीही साधारणपणे पन्नास एक वर्षांपूर्वी या सर्व जोडगोळ्या घरोघरी नांदत होत्या. कारण त्यांची आत्यंतिक निकड ही भासायचीच. हल्ली आधुनिक टू इन वन उपकरणे जसे की मिक्सर, ओव्हन, वॉशिंग मशीन, डिशवॉशर, फ्रायपॅन आजच्या समस्त गृहिणीवर्गाला सेवा द्यायला हजर असतात. तद्वत माझ्या पिढीतल्या व त्याही आधीच्या पिढीतल्या गृहिणींचा दिवस उपरोल्लेखित वस्तूंच्या मदतीनेच सुरू व्हायचा.

या लेखाच्या निमित्ताने जुन्या जमान्यातील इतिहासमा झालेल्या वस्तूंची नावे डोळ्यांसमोरून तरळून गेली. घंगाळ, हात्री, गावी, ओग्राल, गुंड्या, तपेली, उलथनं, वेळणी, पडगा-(मिठाचा लाकडी सट) चौफुला, सोऱ्या, शेळी, गडू, लोटी, जाजम, मापटं, झंपर, दशमी (दुधातली भाकरी)

घरची लहान थोर मंडळी, पै पाहुणा यांच्या पोटापाण्याची काळजी घेऊन, त्यांना तृप्त करण्यासाठी आमची आई व आजी याच वस्तूंवर विसंबून असायची. यंत्राने माणसाच्या जीवनाचा ताबा घेण्याआधीचा तो काळ होता. खलबत्त्यात दाण्याचे कूट, विविध प्रकारचे मसाले कुटणे, पाटा-वरवंट्यावर पुरणपोळीचे पुरण, चटण्या वाटणे या कृतीने सांध्यांना, स्नायूना आपोआप व्यायाम घडायचा. मात्र आजच्या धावपळीचे जीवन व बदललेल्या राहणीमानामुळे कुटुंबातल्या कोणालाच वेळ पुरत नाही. साहजिकच आपले आयुष्य चोवीस तास कोणत्या ना कोणत्या यंत्राशीच निगडित झाले आहे. परिणामी मुद्दामहून चालायला जाणे, जिममध्ये जाणे, योगासनांचे क्लास हे ओघाने आलेच. अर्थात यामध्ये वाईट काहीच नाही. पण पूर्णतः यंत्रावर अवलंबून राहिल्यामुळे व्यक्तीची नैसर्गिक हालचाल, उठणे, बसणे, वाकणे कमी झाले आहे, हे नाकारता येत नाही. दोन कपडे धुवून, पिळून वाळत टाकणेसुद्धा आता जिवावर येते. त्यासाठी वॉशिंग मशीनच हवे! असो. काळाबरोबर बदलायलाच हवे.

ईश्वरनिर्मित या सृष्टीत पिंड-ब्रह्मांड, आत्मा-परमात्मा, अणू-परमाणू, द्वैत-अद्वैत, तन-मन, जीव-शिव, सूक्ष्म-स्थूल या जोड्यांबद्दल आपण वाचतो, ऐकतो. त्यामधील संबंधाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न हजारो वर्षे चालू आहे. एक मात्र खरे मानवासहीत सर्व प्राणीसृष्टी आणि निसर्ग यांचे नाते अतूट आहे. या नात्याशी फटकून न वागता स्वतःला उन्नत केले, तरच आपल्या जगण्याला अर्थ आहे. जन्माला आल्यापासून शेवटच्या श्वासापर्यंत किंवा त्यानंतरही निसर्गाशी आपली नाळ जोडलेली असते. ही जोडी मुद्दाम जुळवावी लागत नाही, तर युगानुयुगे हे संधान परस्परांशी जोडलेलेच राहते.

■

**सौ. श्यामला वि. पळणीटकर**
दादर, मुंबई - २८
दूरध्वनी : २४२२२३३६

वेचक-वेधक

# काकपुराण

मनोज आचार्य

कावळा हा अनेकांना कर्णकर्कश आवाजात काव काव करणारा काळा, अत्यंत उदंड, धूर्त आणि चलाख वृत्तीचा असा पक्षी वाटत असला, तरीही तो जगभरातील अनेक देशांतील मानवी संस्कृतीमध्ये फार मोठी भूमिका बजावतो. तेही पौराणिक, आध्यात्मिक आणि धार्मिक चिन्हांमधून. पूर्व आशिया, युरोपात मध्ययुगापासून कावळ्यांविषयीचा पौराणिक, आध्यात्मिक आणि धार्मिक दृष्टीने सकारात्मक व नकारात्मक समज खोलवर रुजला होता. इ.स.पूर्व १७,००० मध्ये फ्रान्समधील लास्कॉक्स लेण्यांत कावळ्याचे चित्रं पाहायला मिळते. त्या शिवाय प्राचीन इजिप्त, ग्रीस आणि इटलीमधील पुरातन मातीची भांडी, शस्त्रे किंवा दगडांवरदेखील कावळ्यासारख्या दिसणाऱ्या पक्ष्याची रेखाचित्रे कोरलेली वा चितारलेली पाहायला मिळतात. त्याच बरोबर पाश्चात्त्य परंपरेच्या पौराणिक कथांमध्ये कावळा नकारात्मकतेचे प्रतीक, तर कधी सकारात्मकतेचे प्रतीक म्हणून पाहायला मिळतो. बायबल, ग्रीक आणि रोमन पौराणिक कथा, मूळ अमेरिकनांच्या लोककथा, शेक्सपियर आणि इसॉपच्या दंतकथा या सगळ्यात तुम्हाला कावळा हमखास सापडतो. प्राचीन काळी कावळा हा रोमन धर्मातील सर्वोच्च देव अपोलो याचे प्रतीक मानले जायचे. ग्रीक संस्कृतीत कावळे महत्त्वाचे संदेशवाहक किंवा देव स्वरूपात आजही सेल्टिक तसेच स्कँडिनेव्हियन समाजामध्ये मानले जातात. या शिवाय गूढकथा, दंतकथा आणि रहस्यकथा, मिथककथा यात कावळा दुष्ट आणि मृत्यू तसेच विनाशासंबंधित असा पाहायला मिळतोच. बायबलमध्ये कावळ्याला अपवित्र मानले जात असले तरी, त्याला विशेष महत्त्वही आहे.

सुमारे १२,००० ते ४०,००० वर्षांपूर्वी मूळ अमेरिकन (Native American) लोक जे भटक्या जमातीमधील म्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्या अनेक भटक्या जमाती अस्तित्वात होत्या. त्याचबरोबर त्यांची अनेक राज्ये, शहरे व भरभराटीला आलेल्या संस्कृती व भाषा होत्या. आज त्या लुप्त झालेल्या आहेत किंवा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. या जमातींमधील काही जमाती फार पूर्वी कावळ्याला (Raven) कोयोट अर्थात कोल्ह्याप्रमाणे फसवणूक करणारा म्हणून मानत. तर काही जमाती कावळ्याला आत्मे चोरणारा म्हणूनही ओळखत. कावळ्याच्या कुप्रथेविषयी वा इतर गोष्टींविषयी त्या त्या जमातींच्या संस्कृतीत अनेक दंतकथा आहेत. काही दंतकथांमध्ये कावळ्याला परिवर्तनाचे प्रतीक म्हणूनही दाखवले गेले आहे. कारण कावळ्याची बुद्धिमत्ता हे त्यात सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणून दर्शवले गेले आहे. शिवाय काही दंतकथांमध्ये, कावळा हा सामान्यतः जगाच्या निर्मितीपासून मानवजातीला मिळालेल्या सूर्यप्रकाशाच्या देणगीपर्यंत सर्व गोष्टींशी संबंधित कसा आहे, तेही दाखवले गेले आहे.

एका ग्रीक पौराणिक कथेनुसार अपोलोच्या अनेक स्त्रिया या प्रेमिका होत्या, तसेच अनेक पुरुष प्रेमीही होते त्यात इस्किस हा पुरुष प्रेमी व थिस्सलियनची राजकुमारी कोरोनिस या दोन व्यक्ती अपोलोच्या प्रमुख होत्या. अपोलो याला असा संशय होता की, कोरोनिस आणि इस्किस यांचे परस्पर प्रेमसंबंध आहेत. ते जाणून घेण्यासाठी तो आपला संदेशवाहक दूत असणाऱ्या पांढऱ्या कावळ्याला हेरगिरी करण्यासाठी त्यांच्या मागावर पाठवतो. काही वेळानंतर तो कावळा अपोलो याला येऊन सांगतो की, आपला संशय खरा आहे, कोरोनिस ही आपल्याशी विश्वासघात करते आहे. तिचे इस्किसशी प्रेमसंबंध आहेत. ते ऐकून अपोलोचा राग अनावर होतो. त्या रागाच्या भरात तो त्या पांढऱ्या कावळ्यालाच जाळण्याचा प्रयत्न करतो. त्यात तो कावळा वाचतो, मात्र त्याचा रंग कायमचा काळा होतो. त्यामुळे कावळ्याचा रंग काळा. अशी ही प्रसिद्ध दंतकथा ग्रीक संस्कृतीत आहे.

भारतातील प्रांताप्रांतातील वाङ्मयातदेखील म्हणजे लोकसाहित्य, पञ्चतन्त्र कथा, पुराण वाङ्मय, संत-साहित्य, धार्मिक ग्रंथ या सर्वांत कावळ्याची उपस्थिती अनेक वर्षांपासूनची आहे. याला नवीन शोधानुसार शास्त्रीय कारण असे आहे की, इतर पक्ष्यांपेक्षा कावळ्याकडे एक प्रकारची विशिष्ट चेतना असते, ती चेतना त्यांना त्यांच्या सभोवतालच्या जगाबद्दल जाणीवपूर्वक जागरूक राहण्यास सक्षम ठेवते. अर्थात तसे त्यांचे व्यक्तिनिष्ठ अनुभवही असतात. त्यालाच संवेदनात्मक, चेतना असे म्हटले जाते. त्यामुळे कदाचित वाङ्मयाच्या अनेक दालनात त्यांचा मुक्त संचार असावा.

आपल्या पुराण वाङ्मयातून तर कावळा अनेकवेळा भेटतो. ज्ञानेश्वरीतही चवथ्या अध्यायातील २४व्या श्लोकात कावळ्याचा उल्लेख आहे.

पैं चंद्रोदया आरौते । जयांचे डोळे फुटती असते । ते कावळे केवी चंद्राते । ओळखती ।।४.२४।।

भावार्थ-चंद्र नभात उगवता क्षणी कावळ्यांची दृष्टी जाते, मग कावळे चंद्रास ओळखतील कसे?

संत तुलसीदास रचित रामचरितमानस मधील उत्तरकाण्डमध्ये 'काकभुशुण्डि -गरुड संवाद' आहे. त्यात विष्णूचे वाहन गरुडराज याला काकभुशुण्डि रामकथा आणि राम महिमा ऐकवतो.

'चाणक्यनीति' हा संस्कृत ग्रंथातही प्रकरण सहात आणि १९व्या श्लोकामध्ये कावळ्याच्या वैशिष्ट्यपूर्ण गुणांचा उल्लेख केला आहे. जे गुण मानवाच्या हिताचे आहेत.

व्यंकटेश स्तोत्रातील ३४व्या ओळीतही कावळ्याचा उल्लेख आहे. 'गांवीचे होते लेंडवोहळ । गंगेसी मिळतां गंगाजळ । काकविष्ठेचे झाले पिंपळ। तयासी निंद्य कोण म्हणे।।' अशी ओळ आहे. याचा अर्थ गंगेस कोणतेही पाणी जाऊन मिळाले, की ते पवित्र गंगाजळ होते. तसेच पिंपळाच्या झाडांची फळे कावळा खाऊन त्याच्या विष्ठेतून त्या फळांच्या बिया बाहेर पडून पिंपळ कुठेही रुजतो.